गुरुवार, 03 नोव्हेंबर 2022
किमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - 02 अंक -85
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी

●MARATHI ●DAINIK ●AURANGABAD (MAHARASHTRA) ●THURSDAY 03 NOVEMBER 2022 | adhunikkesari.com Adhunik Kesari | ●YEAR-02 ●ISSUE-85 ●TITLE CODE : MAHMAR51117 ●PAGE-10 ●PRICE-5

## चर्चेतली बातमी

### टोमॅटो उत्पादक अडचणीत

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** टोमॅटो जास्त प्रमाणात उपलब्ध झाल्याने टोमॅटोच्या दराची मोठी घसरण झाली आहे. ८० रुपयांवरून टोमॅटोचे दर २५ ते ३० रुपयांवर आले आहेत, त्यामुळं शेतकरी आता आर्थिक संकटात सापडला आहे. टोमॅटोची निर्यातही मंदावली आहे त्यामुळे टोमॅटो इथेच राहिल्याने टोमॅटोच्या दरात परिणाम झाल्याच समोर येत आहे. आठ ते दहा दिवसांपासून दर निम्म्यावर आले आहेत. या ठिकाणाहून टोमॅटो हे राज्यातील विविध ठिकाणासह परराज्यात आणि परदेशात पाठवले जातात. राज्यबाहेरून टोमॅटो बाजारपेठेत दाखल झाल्याने टोमॅटो उत्पादक शेतकऱ्यांचा टोमॅटो हा नाशकातच राहिल्याने त्याचा भाव मोठ्या प्रमाणात कमी झाला आहे. नाशिकमध्ये सध्या स्थितीला मध्य प्रदेश आणि कर्नाटकातून टोमॅटो मोठ्या प्रमाणात येत आहे. नाशिकमधील भाजीपाल्याची बाजारपेठही राज्यातील अग्रगण्य बाजारपेठ असून या ठिकाणाहून विविध प्रकारचा भाजीपाला टोमॅटोसह फळभाज्या या बाहेर पाठवल्या जातात. परंतु, आता नाशिकमधून होणारी टोमॅटोची निर्यात कमी झाल्याने सध्या बाजारात टोमॅटोची आवक वाढली.

# कुंकू लाव मग तुझ्याशी बोलतो

## संभाजी भिंडेंचा महिला पत्रकाराशी बोलण्यास नकार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : संभाजी भिडे हे बुधवारी मंत्रालयात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेण्यासाठी आले होते. त्यावेळी साम या मराठी वृत्तवाहिनीच्या महिला पत्रकार रुपाली बडवे यांनी भिडे यांना गाठून त्यांची प्रतिक्रिया जाणून घेण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी भिडे यांनी प्रश्न विचारणाऱ्या महिला पत्रकार रुपाली बडवे यांच्याकडे पाहिले. या महिला पत्रकाराच्या कपाळावर कुंकू नसल्याचे भिडे गुरूजी यांना आवडले नाही. या कारणामुळे या महिला पत्रकाराला भिडे गुरूजी यांनी मुलाखत देण्यास थेट नकार दिला.**



महिला पत्रकाराला मुलाखत देण्यास नकार देताना संभाजी भिडे म्हणाले, ' आमची अशी भावना आहे की प्रत्येक स्त्री ही भारतमातेचे रूप आहे. भारतमाता विधवा नाही आहे. कुंकू लाव मग मी तुझ्याशी बोलतो.' इतके वक्तव्य करून संभाजी भिडे पुढे चालू लागले. त्यानंतही या महिला पत्रकाराने त्यांच्याशी बोलण्याचा प्रयत्न केला. मात्र भिंडे यांनी महिला पत्रकाराशी बोलण्यास अखेरपर्यंत नकारच दिला. संभाजी भिंडे यांच्या या भूमिकेचे महिला पत्रकार रुपाली बडवे यांनी ट्विट करत निषेध केला आहे. त्या आपल्या ट्विटमध्ये म्हणतात, 'आज माझ्यासोबत घडलेला हा सगळा प्रकार.. आपण एखाद्याचं वय बघून त्याला मान देतो मात्र, समोरची व्यक्ती देखील त्या पात्रतेची असावी लागते. मी टिकली लावावी-लावू नये किंवा कधी लावावी हा माझा अधिकार आहे. आपण लोकशाही असलेल्या देशात राहतोय.' दरम्यान, संभाजी भिडे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मंत्रालयात भेट घेतली. आपण मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांशी देश आणि धर्माबाबत चर्चा केल्याचे संभाजी भिडे यांनी म्हटले आहे.

## भारत जोडो यात्रा



काँग्रेसची भारत जोडो यात्रा तेलंगणाची राजधानी हैदराबाद येथे पोहोचली असून या यात्रेत काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यासह बॉलिवूड अभिनेत्री आणि चित्रपट निर्माती पूजा भट्टही सामील झाली आहे.

# भारताचा बांगलादेशवर पाच धावांनी विजय

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** टी२० विश्वचषकात ग्रुप बी मध्ये भारत आणि बांगलादेश यांच्यात ॲडलेडमध्ये सामना खेळला गेला. अटीतटीच्या सामन्यात टीम इंडियाचा बांगलादेशवर पाच धावांनी निसटता विजय झाला असून उपांत्य फेरीतील स्थान जवळपास निश्चित केले आहे. डकवर्थ लुईसच्या नियमानुसार धावांचे लक्ष हे १६ षटकात १५१ करण्यात आले होते. टीम इंडियाच्या गोलंदाजांनी शानदार गोलंदाजी करत भारताला विजय मिळवून दिला. विराट कोहलीला टी२० विश्वचषक २०२२ मध्ये दुसऱ्यांदा सामनावीराचा पुरस्कार देण्यात आला. बांगलादेशचा कर्णधार शकिब अल हसन याने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. टीम इंडियाने २० षटकांत ६ बाद १८४ धावा केल्या. बांगलादेशला सामना जिंकण्यासाठी १८५ धावा करायच्या होत्या. धावांचा पाठलाग



करताना लिटन दास याने तुफानी खेळी करत करत २७ चेंडूत ६० धावा केल्या. त्यामुळे एकवेळेस असे वाटत होते की, बांगलादेश सामना भारताच्या हातून कडून घेणार. पण पावसाने मध्ये अडथळा आणला आणि तो भारतासाठी फायद्याचा ठरला. अर्धशतक करून खेळत असलेल्या दास याला पावसानंतरच्या पहिल्याच षटकात केएल राहुलने थेट थ्रो करत धावबाद केले. त्यानंतर बांगलादेशचा डाव पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे कोसळला. शमीने शांतोला बाद करत भारताला दुसरे यश मिळवून दिले. या स्पर्धेत आत्तापर्यंत भारताचा सर्वात यशस्वी गोलंदाज राहिलेल्या अर्शदीपने बांगलादेशचा कर्णधार शाकीब व उपकर्णधार अफीफ यांना एकाच षटकात बाद करत बांगलादेशच्या विजयाच्या आशांना सुरुंग लावला. तळाच्या फलंदाजांना मोक्याच्या क्षणी मोठे फटके न खेळू देता भारतीय गोलंदाजांनी बांगलादेशला १४५ धावांवर रोखत संघाला विजय मिळवून दिला.

# 'नीट' परीक्षार्थींच्या करिअरशी खेळतंय कोण ?

## व्यापक जागृती करण्याचे राष्ट्रीय परीक्षा एजंसीला उच्च न्यायालयाचे आदेश


आधुनिक केसरी न्यूज

औरंगाबाद : संकेतस्थळावर उपलब्ध होणाऱ्या भिन्न गुणतालिका आणि त्यामुळे 'नीट'च्या परिक्षार्थींना होणारा मनस्ताप यांचे वाढते प्रकार बघता आघाडीच्या वर्तमानपत्रांमधून विद्यार्थ्यांना आवाहन करणारे प्रगटन अथवा जाहिरात प्रकाशित करून तसेच आपल्या संकेतस्थळाद्वारे राष्ट्रीय परीक्षा एजंसीने व्यापक जनजागृती घडवावी व अशाप्रकारे फसवल्या गेलेल्या विद्यार्थ्यांच्या तक्रारींबाबत तातडीने योग्य ती पाऊले उचलावीत असे निर्देश मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिले आहेत. न्या रविंद्र घुगे व न्या एस.ए.देशमुख यांच्या खंडपीठाने उपरोक्त आदेश दिले. कु. भुमिजा नेमिचंद राठोड या विद्यार्थीनीने दाखल केलेल्या याचिकेवर निकाल देताना उच्च न्यायालयाने उपरोक्त आदेश दिले.




साधारण महिन्याभराच्या कालावधितच भिन्न आणि विसंगत निकालपत्रिकांच्या तीनहून अधिक केसेस आमच्या निदर्शनास आल्या आहेत. दिल्ली उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयासमक्षही अशाच केस दाखल झाल्याचे आम्हाला समजले आहे. या प्रकरणांची वाढती संख्या आणि व्याप्ती पाहता नीट परीक्षा राबवणाऱ्या राष्ट्रीय परीक्षा एजन्सीने विद्यार्थ्यांच्या हिताकरता तातडीने आपल्या संकेतस्थळावर व मुद्रीत माध्यमांद्वारे अशा प्रकारे फसवणूक अथवा दिशाभूल झालेल्या परीक्षार्थींनी आपल्या तक्रारींबाबत स्वतःहून पुढे येऊन आवाज उठवण्याचे आवाहन प्रकाशित करावे व प्राप्त तक्रारींबाबत सायबर गुन्हे शाखा अथवा सक्षम तपास यंत्रणांना अवगत करवून उचित तपास करण्याची विनंती करावी असे उच्च न्यायालयाने म्हटले आहे. याबाबत हकीगत अशी की औरंगाबाद येथील विद्यार्थीनी भुमिजा राठोड हिने वैद्यकीय शाखेसाठीची नीट प्रवेश परीक्षा दिली होती. या परीक्षेचा निकाल 7 सप्टेंबर 2022 मध्ये जाहीर झाला. भुमिजा हिस निकालाच्या दिवशी डाऊनलोड केलेल्या निकालपत्रात 720 पैकी 661 गुण प्राप्त झाल्याचे आढळूने आले. त्यामुळे वैद्यकीय शिक्षण घेऊन डॉक्टर होण्यासंबंधी तिच्या आशा पल्लवित झाल्या. तथापि, तीन दिवसानंतर काही कारणांसाठी पुन्हा एजंसीच्या संकेतस्थळावरून निकालपत्र डाऊनलोड केले असता त्यात तिला अवघे 218 प्राप्त झाल्याचे आले. घडल्या प्रकारामुळे व्यथित होऊन भुमिजा हिने परीक्षा एजंसीकडे ई-मेल पाठवून दाद मागितली. परंतू, त्यास कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने अखेर तिने उच्च न्यायालयात दाद मागितली. याचिकेच्या सुनावणी दरम्यान उच्च न्यायालयाने परीक्षा एजंसीस नोटीस बजावली व याचिकाकर्तीच्या मूळ ओएमआर उत्तरपत्रिका सादर करण्यास एजंसीच्या वकीलांना सुचित केले. ओएमआर उत्तरपत्रिकांमधील उत्तरे ही अल्प गुण असलेल्या निकालपत्राशी मेळ खात असल्याने न्यायालयाने याचिका नामंजूर केली. तथापि, देशभर अशा प्रकारे निष्पाप विद्यार्थ्यांच्या अमूल्य शैक्षणिक कारकिर्दीशी खेळणारे नेमके कुठले रॅकेट सक्रीय आहे की काय ? एजंसीच्या संकेतस्थळाशी कुणी सायबर गुन्हेगार छेडछाड करीत आहेत काय ? याबाबत संशयास जागा असल्याचे मत न्यायालयाने नोंदवले. त्यामुळे असे प्रकार देशभर किती ठिकाणी उद्भवले आहेत याचा परीक्षा एजंसीने अभ्यासपुर्वक आढावा घ्यावा आणि घडल्या प्रकरणांच्या मुळाशी जाऊन त्याबाबत गांभीर्याने कारवाई करावी असे मत उच्च न्यायालयाने नोंदवले. याचिकाकर्त्यांच्या वतीने ॲड चैतन्य धारूरकर यांनी काम पाहिले. त्यांना ॲड मयुर सुभेदार यांनी सहाय्य केले. परीक्षा एजंसीकडून ॲड आशिष जाधवर यांनी काम पाहिले.



विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# गाथा एका शूरवीराची


आधुनिक केसरी


कदाचित ' शांतिदूत ' अशी प्रतिमा असणाऱ्या पंडितजींच्या स्वभावाला ते मानवले नसावे. पण गोवा भारतात सामील व्हावे ही सगळ्याच भारतीयांच्या मनातील सुप्त इच्छा होती. भारताच्या एकता आणि अखंडतेसाठी ते आवश्यकही होते. भारताला स्वातंत्र्य मिळूनही गोवा भारतात सामील व्हायला उशीर का ? भारत सरकार कारवाई का करत नाही ? हा सल हेमंतच्या मनात होता. गोवा मुक्तीसाठी आपल्या प्राणांची बाजी लावण्याचे या बहाद्दराने मनोमन ठरवले होते.

हेमंत मूळचा नाशिकचा. वडील ध्येयवादी शिक्षक. नाशिक शिक्षण प्रसारक मंडळाच्या संस्थापकांपैकी एक. तो काळ देशभक्ती, देशप्रेमाने भारलेला होता.लक्ष्मणराव सोमणही याच ध्येयवादाने प्रेरित होऊन उज्वल राष्ट्रीय चारित्र्य आणि देशभक्तीने प्रेरित झालेले विद्यार्थी घडवावे म्हणून प्रयत्नशील होते. त्याच उद्देशाने त्यांनी शाळेची स्थापना करून शिक्षण प्रसाराचे कार्य केले. घरातील संस्कार आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्कार यामुळे हेमंतचे उज्ज्वल चारित्र्य घडत गेले आणि एका सुसंस्कृत, संपन्न अशा व्यक्तिमत्वाला आकार मिळाला. पाहताक्षणीच छाप पडावी असे हेमंताचे व्यक्तिमत्व होते.

सहा फूट उंची, गौरवर्ण, सुदृढ आणि रेखीव शरीरयष्टी, पाणीदार डोळे आणि हसतमुख चेहरा असलेला हेमंत उत्तम लोकसंघटक होता. त्याचे वागणे, बोलणे समोरच्या व्यक्तीला लगेच प्रभावित करीत असे. व्यायाम आणि खेळांची आवड असल्याने त्याचा मूळचाच सुदृढ असणारा बांधा आणखी रेखीव बनला होता. हेमंतला बी कॉम झाल्यावर मुंबईत ' बेस्ट ' मध्ये चांगल्या पगाराची अकाउंटंट म्हणून नोकरी मिळाली. घरात त्याच्या लग्नाचे वारे वाहू लागले. पण ' बेस्ट ' मध्ये काम करण्यात हेमंतला स्वारस्य वाटत नव्हते.

(क्रमशः)


क्रांतिसूर्य हेमंत लक्ष्मण सोमण



# आनंदी पहाट

## मनाला आनंदी ठेवण्याची आवश्यकता

आधुनिक केसरी

“आपले मन” या शब्दांमधूनच आपल्या स्वतःच्या मनाविषयीच्या भाव-भावना प्रकट होत असतात. आपल्याला आपल्या स्वतःच्या मनाची असलेली ऊब आणि त्यामुळेच निर्माण झालेलं आपल्या जागाबरोबरचं नाते अतूट असते. आपण शरीराने आपल्या घरापासून दूर असतो तेव्हा देखील आपल्या मनात आपले घर हे घर करून राहीलेले असते. हि घरघर प्रेत्येकाच्या जीवनाचा अविभाज्य घटक असल्याप्रमाणे अनुभवली जात असते. आपले मन आणि धन एकाच नाण्याच्या दोन बाजू असल्यासारख्या असतात. आपले प्रत्येक स्वप्न साकार होताना आपल्याला मिळणारा आनंद निश्चितच निराळा असतो. पण हि स्वप्न साकारण्यासाठी आपल्या मनाची यथायोग्य मशागत करणेही तितकेच जरुरीच असते. सद्यःस्थितीत साधेपणा म्हणजे भोळेपणा अथवा गबाळेपणा समजला जातो. अत्याधुनिकीकरण आणि काही प्रमाणात अंधानुकरण यामुळे एकूणच आपल्या राहणीमानात बरेच बदल होत असतात. हे होणारे बदल एका अर्थी आपला विकासच घडवत असतात. आपले केवळ नीटनेटके राहणे हे पुरेसे नसून आपण चारचौघांमध्ये वेगळे आणि आकर्षक दिसणे आवश्यक झाले आहे. मुळातच सुंदर असणे आणि आकर्षक दिसणे या दोन्ही गोष्टी जरी सौंदर्याची अनुभूती देणाऱ्या असल्या, तरीही केवळ सुंदर असणे सुद्धा पुरेसे नसून आकर्षक दिसणे आणि त्यासाठी नीटनेटके राहणे आवश्यकच असते. यामुळेच सुंदर असण्यापेक्षाही सुंदर दिसण्यासाठी काहीजणांचा कल असतो. या अशा सुंदर आणि आकर्षक राहणीमानासाठी निश्चितच मानसिककदृष्ट्या काही बाबी करणे अनिवार्य असते. ह्या राहणीमानाची नुसती सवय होऊन चालत नाही, तर असे राहणीमान टिकवून ठेवण्यासाठी थोडाफार खर्चही करावा लागणे स्वाभाविक असते. ह्या सौदर्याची प्रचीती घेण्यासाठी आपल्या मनाला आनंदी ठेवणे जरुरीचे असते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

## परमार्थी स्वानंद | हरिपाठी ||

यत्न हाच देव | मानी चिंतनात ||
असावे कर्मात | अधिष्ठान ||१||

कर्मावीन नाही | इच्छेस पूर्तता ||
अंगी सतर्कता | असू द्यावी ||२||

अहंकार जाळी | पुण्याच्या राशीला ||
कर्माच्या गतीला | खीळ घाली ||३||

सात्विक भावाने | स्फुल्लींग जागावा ||
संसार तोलावा | संयमाने ||४||

कर्मावीन कैसा | संसारी आनंद ||
परमार्थी स्वानंद | हरिपाठी ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# ।। तुमच्याविना गजानना ।।

आधुनिक केसरी

गोंधळून गेलेल्या या मना
चांगले-वाईट ही कळेना
घोळ मनाचे काही मिटेना
तुमच्याविना हो गजानना ।।


भावले मनास ते आम्हाला
काही करून हवे आम्हाला
तडजोडी त्यासाठी करितो
लढवतो डावपेच नाना ।।

करू गुरुसेवा वाटे मना
चंचल मनाचे चाळे नाना
करी विनवणी अरुणदास
पालटावे मना, गजानना ।।



अरुण वि. देशपांडे
संपर्क क्र. 9850177342

# ।। दासबोध स्तवन ।।



## मंगलाचरण

आधुनिक केसरी

मित्रांनो आपण 28 व्या ओवीत काय शिकलो? तर अध्यात्मविद्या शिकण्यासाठी भक्तिमार्गाचा अवलंब केला पाहिजे हे होय. आता पुढे समर्थ आपल्याला सांगतात की ज्याचे मन व बुध्दी स्थिर नाही त्याने अद्वेत ग्रंथ वाचण्याच्या भानगडीत पडू नये. ज्याला खरोखरच परमार्थाची तळमळ आहे त्यांनीच ग्रंथ वाचावेत.ज्याला परमार्थाची आवड आहे त्यालाच हे ग्रंथ समजतील.परमार्थद्रुष्टी किंवा अध्यात्मिक विचार नसणारे लोक संतांच्या विचारावरचं आरोप करतात.खरे पहाता भाषा हे ज्ञानाचे वाहन असल्याने ज्ञान वहाण्या पुरते उपयोगी आहे आहे किंवा नाही एवढे पहायला हवे काही लोक ज्ञानावरून वादंग माजवतात. अशा लोकांच्या साठी समर्थ दहा ओव्या लिहितात. काही लोक तर मराठी त चांगले ग्रंथ नाहीत असे म्हणून आपले खाते ज्ञान प्रगट करतात. अशा मूर्ख लोकांच्या विचाराची कीव करावी वाटते. एका पेटीत अनेक रत्ने ठेवली. जेव्हा कमनशिबी माणसच्या कडे जेव्हा ती पेटी येते तेव्हा लोखंडाची पेटी आहे म्हणून दुर्लक्ष करतो. त्याला ती पेटी अमुल्य रत्नांची आहे हे त्याला समजत नाही. त्याचप्रमाणे मराठी भाषेच्या बाबतीत पंडीत लोक वागतात, मराठी मध्ये अर्थ भरलेला आहे. वेदांत "सिध्दांत हे ज्याला समजती तो खरा भाषा प्रेमी होय. आपल्या अंगणात परीस पडलेला असेल तर तो घ्यावा. त्याचप्रमाणें मराठी मध्ये जर सोपे पण अनुभव सिध्द अद्वेत आत्मज्ञान सहजासहजी मिळत असेल तर ते अवश्य घ्यावे.

वेदांतज्ञान किंवा अध्यात्मज्ञान संस्कृत मध्ये असो किंवा मराठी मध्ये असो ते यथार्थ पणे आकलन होण्यास सत्समागम जरूर आहे. समर्थ म्हणतात की विद्या मिळवण्यासाठी श्रम न करता केवळ सत्समागम केला तर सगळा शास्त्रार्थ सहजपणे समजतो.

मित्रांनो एक खरं तर अगदी तळमळीने पोटतिडकीने सांगणे आहे की सतत चांगल्या विचारांच्या माणसाच्या सहवासात रहावे चांगले ग्रंथ वाचावे. व हा मनुष्य जन्म जो एकदाच मिळाला आहे त्याचे सोने करून घ्यावे.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

# परमेश्वराची खरी पूजा

आधुनिक केसरी

देहाभिमान नाहीसा झाला म्हणजे काळजीचे कारण उरत नाही. 'मी साधन करतो' असा अभिमान देहाभिमानामुळे उत्पन्न होतो. हा साधनाभिमानही घातुक असतो. तेव्हा, जे काही होते ते परमेश्वराच्या सत्तेने होते असे मानीत जावे. आपले हित कशात असते ते त्यालाच उत्तम कळते, आणि तो सर्व तुमच्या बऱ्याकरिताच करीत असतो. तेव्हा कसलीही काळजी करू नये. त्याच्यावर विश्वास टाकून आनंदात असावे, चित्तवृत्ती परमेश्वराकडे लावावी. तेथून ती विषयाकडे जाऊ लागली म्हणजे संधी साधावी; म्हणजे त्यावर लक्ष असावे. मन विषयाकार होऊ लागले म्हणजे माझे स्मरण करावे. बऱ्याच वेळाने आठवण झाली तरी माझे स्मरण करावे, म्हणजे पुढे पुढे लवकर आठवण होऊ लागेल. ज्याचे मन पूजेत असते त्याची खरी पूजा होते. सर्वांभूती भगवद्भाव, आणि कोणाचे मन न दुखविणे, ही पूजा खरी होय. पूजेला बाह्योपचाराची गरज नसते. मन मात्र अर्पण होणे जरूर आहे. पूजेत भाव असणे जरूर आहे. भक्ति आणि वैराग्य यांच्यामध्ये तसा फरक नाही. परमेश्वराची आवड म्हणजे भक्ति, आणि विषयाची



अनासक्ति म्हणजे वैराग्य. रामराय वनवासात जायला निघाले तेव्हा त्यांनी सीतामाईला बरोबर न येण्याविषयी सांगितले. त्या वेळी तिने उत्तर दिले की, 'रामा ! तुझ्याबरोबर असेन तर मला सर्व कष्ट सुखमय आहेत; आणि तुझ्याशिवाय असेन तर सर्व सुखोपभोग हे मला कष्टमय आहेत.' सीता ही रामाची मोठी भक्त होती, आणि म्हणून तिची अशी अवस्था होती. तिला परिस्थितीची जाणीव नव्हती. पण आपली गोष्ट अशी नाही. आपण एकीकडे परिस्थितीवर अवलंबून आहोत आणि दुसरीकडे आपल्याला भगवंत पाहिजे, म्हणून आपण मध्यम मार्ग धरावा; तो हा की, आपण म्हणावे, 'रामा, माझी परिस्थिती तुझ्या इच्छेवर अवलंबून आहे.' असे आपण मनःपूर्वक म्हटले की परिस्थिती बदलली तरी आपला आनंद टिकेल. 'माझ्या देवाला हे आवडेल का ?' अशा भावनेने जगात वागणे हाच सगुणोपासनेचा हेतू आहे. जसजशी आपण सगुणाची उपाधी वाढवतो तसतशी आपली इतर उपाधी कमी कमी होत जाते. सगुणाच्या उपासनेला आज आपण कल्पनेने प्रारंभ करू, मागून निश्चयात्मकता आपोआप येईल. चैतन्य सर्व ठिकाणी भरलेले आहे; ते कुठेही प्रकट होऊ शकेल. त्याला प्रकट करणे हे आपल्या भावनेवर अवलंबून आहे. ज्याची भावना खरी शुद्ध, म्हणजे निःसंशय असते, त्याला दगडाची मूर्तीदेखील देव बनते. भावना मात्र शंभर नंबरी पाहिजे; त्यामध्ये भेसळ उपयोगाची नाही.

**आजचे बोधवचन :** उपाधी वासना नाहीशा करण्यासाठीच नाम घ्यायचे असते.

**-श्री सद्गुरू ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज**

# पुन्हा एकदा निसर्गाच्या तुलनेत आपण काहीच नाही याची जाणीव झाली



आधुनिक केसरी न्यूज

**आकाश सोनवणे**

गॉडविट जातीच्या पक्ष्याने नुकताच एक जागतिक विक्रम स्वतःच्या नावावर नोंदवला. ५ महिन्यांच्या या पक्षाने १३ ऑक्टोबर २०२२ रोजी अलास्का इकडून उड्डाण भरलं. तब्बल ११ दिवस १ तासात त्याने १३५६० किलोमीटर अंतर कापून टास्मानिया इकडे तो उतरला. या ११ दिवसांत त्याचा सरासरी वेग होता ५१ किलोमीटर/तास. या संपूर्ण प्रवासात तो एकदाही झोपला नाही, त्याने काही खाल्लं नाही, त्याने पाणी प्यायलं नाही. तो फक्त उडत होता आपल्या लक्ष्याकडे.... अलास्का इकडे त्याच्या पाठीवर बसवण्यात आलेल्या उपकरणाने त्याच्या या संपूर्ण प्रवासाची नोंद केली आहे. त्याच्या नावावर हा जागतिक विक्रम नोंदवला गेला आहे. गॉडविट नावाचे पक्षी स्थलांतर करण्यासाठी प्रसिद्ध आहेत. हे हवेतून तब्बल ८० किलोमीटर/तास वेगाने उडू शकतात. (उड्डाण करतात ग्लाइड न करता). तळ्याकाठी, मॅन्ग्रूव्हच्या जंगलात यांचं अस्तित्व दिसून येते. निसर्गाच्या या अदाकारीपुढे पुन्हा एकदा नतमस्तक झालो. सलग ११ दिवस असा पृथ्वीच्या दोन टोकांचा प्रवास महासागरावरून करणं ही नक्कीच अविश्वसनीय अशी घटना आहे. आज तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे अश्या घटना उजेडात येत असल्या तरी आपलं अस्तित्व टिकवण्यासाठी त्यांनी केलेला हा हजारो किलोमीटरचा प्रवास मला स्वतःला खूप शिकवून गेला.




# औरंगाबादकरांना इम्प्रेस करण्यासाठी भागवत कराडांचे हे उद्योग

## मराठवाड्यातील प्रकल्प नाकारल्याच्या आरोपावरून जयंत पाटील यांनी सुनावले

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मराठवाड्यातील कोणत्याही प्रकल्पाला मी नकार दिलेला नाही. केंद्रीय मंत्री भागवत कराड यांनी खोटे बोलणे बंद करावे. औरंगाबादकरांना इम्प्रेस करण्यासाठी भागवत कराडांचा उद्योग सुरू असल्याचे जोरदार प्रत्युत्तर राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आणि माजी जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांनी माध्यमांशी बोलताना दिले. मराठवाड्यातील प्रकल्प मंजूर करण्यास जयंत पाटील यांनी नकार दिला असे वक्तव्य भागवत कराड यांनी केले होते त्यावर जयंत पाटील यांनी जोरदार हल्लाबोल करत त्यांच्या आरोपाची पोलखोल केली. फ्लोटींग सॉलर पॅनल प्रॉजेक्टबाबत भागवत कराड यांनी फक्त पत्र लिहिले होते. त्यामुळे सरकार फक्त पत्रावर चालत नाही असेही जयंत पाटील म्हणाले. खरंतर केंद्राच्या



एनटीपीसीकडून प्रस्ताव यायला हवा होता मात्र भागवत कराड यांनी राज्यसरकारकडे पत्र दिले. तरी केंद्रीय मंत्री असल्याने आम्ही त्यांच्या पत्राची दखल घेतली व एक समिती गठीत केली. एप्रिलच्या शेवटी पत्र आले आणि जूनच्या सुरुवातीला आम्ही याबाबत समिती गठीत केली. त्यामुळे प्रकल्प घालवला हे सांगणे चुकीचे आहे मी नकार दिला आहे असे म्हणत असतील तर एकतरी कागद दाखवा असेही जयंत पाटील यांनी जाहीर आव्हान दिले. भागवत कराड यांना राज्यसभा नाही तर औरंगाबादमध्ये लोकसभेला भाजपने उभे राहायला सांगितले आहे त्यामुळे ते अस्वस्थ झाले आहेत. निवडणूक लढवायची असेल तर लढवावी पण खोटं बोलू नये. माझ्यादृष्टीने त्यांना मी जास्त महत्त्व देत नाही असा टोलाही जयंत पाटील यांनी लगावला. आम्ही नाचत नाही आम्ही जे काही करायचं असते ते 'करेक्ट' करतो. त्यांना आता काही जमत नसेल म्हणून लोकांना प्रभावित करण्यासाठी ते अशी विधाने करत असतील तर त्यांनी जयंत पाटील यांनी नकार कधी दिला, निगेटिव्ह पत्र आमच्याकडून कधी गेले, त्यांना कुणी नाही म्हटलं याबाबत माहिती द्यावी. प्रकल्प कुणीच थांबवला नाही. त्यांनी फार मोठा तीर मारला असेही नाहीय. त्यांनी प्रकल्प आणला नाहीय. त्यांनी कल्पना रंगवली पाण्यावर सोलर पॅनल बसवू यावर खात्यात याअगोदरच चर्चा सुरू होती त्यामुळे नवीन रॉकेट सायन्स नाहीय असेही जयंत पाटील यांनी स्पष्ट केले.

# अमृता फडणवीसांनी नाकारली गृहखात्याने दिलेली सुरक्षा

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मिसेस उपमुख्यमंत्री अमृता फडणवीस यांनी ट्रॅफिक क्लिअरन्स नाकारण्याचा निर्णय घेतला आहे. आपल्याला सामान्य मुंबईकरांप्रमाणे जीवन जगायचं आहे, अशी प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता यांनी दिली आहे. ट्विटरवरुन त्यांनी हा निर्णय जाहीर केला. राज्य गुप्तचर विभागाच्या अहवालानंतर अमृता फडणवीस यांना वाय प्लस दर्जाची सुरक्षा देण्याचा निर्णय घेण्यात आलाय, तसंच गाड्यांचा ताफा जाताना रस्ताही मोकळा करण्याचे निर्देश देण्यात आले होते. मी सामान्य मुंबईकर आहे आणि मला तसंच जगायची इच्छा आहे. मी मुंबई पोलिसांना विनम्रपणे सांगू इच्छिते, की ट्राफिक क्लिअरन्स पायलट वेहिकल मला देऊ नये. मुंबईतील वाहतुकीची स्थिती आधीच क्लेशदायी आहे. पण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात सुरु असलेल्या पायाभूत आणि विकास प्रकल्पांमुळे आपली त्यातून लवकरच सुटका होईल, याची मला खात्री आहे, अशा आशयाचे ट्वीट अमृता फडणवीस यांनी केलं आहे. यापूर्वी अमृता फडणवीस यांना एक्स दर्जाची सुरक्षा होती. मात्र राज्य गुप्तचर विभागाच्या अहवालानंतर अमृता फडणवीस यांना वाय प्लस दर्जाची सुरक्षा देण्याचा निर्णय घेण्यात आला. वाय प्लस सुरक्षेनुसार आता अमृता फडणवीस यांच्या दिमतीला एक एस्कॉर्ट व्हॅन आणि पाच पोलीस कर्मचारी असतील. पोलिसांची सुरक्षा ही २४ तास असेल.

याशिवाय त्यांच्यासाठी ट्रॅफिक क्लिअरन्स व्हेईकल हे पायलट व्हॅनप्रमाणे काम करण्याची सुविधा देण्यात आली होती. त्यानुसार अमृता फडणवीस प्रवास करताना संबंधित परिसरातील रस्ता मोकळा होईल याची खबरदारी घेतली जाणार होती, मात्र अमृता फडणवीसांनी तो नाकारण्याचा निर्णय घेतलाय.



# आमचा ऊस आंबट आहे काय : प्रकाश बोरसे

## मागण्या मान्य करा अन्यथा ऊस वाहतूक बंद पाडणार : स्वाभिमानी शेतकरी संघटना

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** साखर कारखानदारांनी ऊस तोडल्यानंतर १५ दिवसांच्या आत पहिला हप्ता प्रतिटन २५०० रूपये द्यावा. गेल्या वर्षी तुटलेल्या ऊसाला एफ आर पी पेक्षा दोनशे रुपये जास्त मिळावे. यावर्षी कारखान्यांनी एकरकमी एफआरपी द्यावी, हंगाम संपल्यानंतर ३५० रपये दिले जावेत, अशा विविध मागण्या स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रमुख राजू शेट्टी यांनी. कन्नड येथे संपन्न झालेल्या ऊस परिषदेमध्ये मांडल्या होत्या. त्या संदर्भातल्या मागण्या संबंधितांनी पूर्ण कराव्यात यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेची बैठक आज कन्नड येथे संपन्न झाली. स्वाभिमानी शेतकरी संघटनेची कन्नड ऊस परिषदेमध्ये पारित झालेल्या मागण्या कारखानदार, व्यवस्थापक जोपर्यंत ऊस उत्पादन शेतकऱ्यांच्या हिताच्या मागण्या मान्य करत नाहीत, तोपर्यंत स्वस्थ बसणार नसल्याचा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटने तालुकाध्यक्ष प्रकाश बोरसे, कृषीभूषण भाऊसाहेब थोरात यांच्यासह स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी दिला आहे. स्वाभिमानी शेतकरी संघटना कन्नडच्या वतीने शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी तसेच तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांची बाजू मांडण्यासाठी बुधवार (दि.२) नोव्हेंबर रोजी कन्नड येथील शासकीय विश्रामगृहात पत्रकार परिषद संपन्न झाली यावेळी संघटनेचे पदाधिकारी बोलत होते. दरम्यान, कारखानदारांनी किंवा सरकारने जर तालुक्यातील ऊस उत्पादन शेतकऱ्यांच्या हिताच्या प्रश्नाकडे व संघटनेच्या मागण्यांकडे गांभिर्यानं लक्ष दिलं नाही तर १७ आणि १८ नोव्हेंबरला तालुक्यातील ऊस वाहतूक बंद पाडणार असल्याचा इशाराही संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी यावेळी दिला.

**शेतकऱ्यांना लुबाडणे बंद करा**

बारामती ॲग्रो जिथे राजकारण करते तिथे शेतकऱ्यांना प्रतिटन २७०० रूपये च्या पुढे भाव देते. मग कन्नडचा शेतकऱ्यांना का नको हा काय पाकिस्तानचा शेतकरी आहे का? यावर्षी कारखान्याला बाहेरून ऊसाची अजिबात गरज नाही, परंतु कारखान्याला जास्तीचा ऊस बाहेरून आणला असे दाखवून ऊस वाहतूक, ऊस तोड खर्च प्रतिटन ९५० रुपये शेतकऱ्याकडून वसूल करते, यावर संघटनेने बोलले तर काय राजकारण....का शेतकऱ्यांची लुबाडणूक बंद करा ऊस वाहतूक व ऊस तोडणी खर्च प्रतिटन ६५० रुपये पेक्षा जास्त लावता कामा नये. तुम्ही किती लुबाडणार शेतकऱ्यांना. शेतकऱ्यांच्या हक्कासाठी लढणे म्हणजे राजकारण आणि शेतकऱ्यांना लुटने म्हणजे काय....असा प्रश्नही कन्नड बारामती ॲग्रो यांना स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी उपस्थित केला आहे.

**पारित झालेले ठराव व मागण्या**

- साखर कारखानदारांनी ऊस तोडल्यानंतर १५ दिवसांच्या आत पहिला हप्ता प्रतिटन २५०० रूपये द्यावा.
- मागील हंगामातील आग्रीम प्रतिटन रूपये २०० रुपये रक्कम ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मिळाली पाहिजे.
- ऊसतोड व ऊस वाहतूक खर्च कमी करून शेतकऱ्यांची होणारी लुबाडणूक थांबविली पाहिजे
- काटेमारी बंद झाली पाहिजे
- कार्यक्षेत्रातील व नोंदणीकृत ऊसाचे गाळप नियोजनानुसार करण्यात यावे.
- ऊसतोडणीसाठी घेण्यात येणारी खुशाली खपका बंद झालाच पाहिजे
- ऊस उत्पादक शेतकऱ्यांना योग्य बेणे व त्यासाठी लागणारे आर्थिक साहाय्य करण्यात यावे - कारखाना साईटवर शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी संपर्क कार्यालय चालू करावे - कारखान्यातून होणारे चिमणीद्वारे हवेचे प्रदुषण व पाण्याचे प्रदुषण थांबले पाहिजे.
- ६२१७५ ऊसाचे वाण व २६५ यांची तोड या वर्षीच्या गळीत हंगामात करण्यात यावी.

**अशा प्रमुख मागण्या आहेत**

यावेळी कृषीभूषण भाऊसाहेब थोरात, चंद्रकांत देशमुख, तालुकाध्यक्ष प्रकाश बोरसे, दिनकर पवार, रामेश्वर भुसारे, शरद मोहिते, जगदीश नलावडे, सुदाम जगताप, चव्हाण मुक्तेश्वर चव्हाण, पंकज चव्हाण, निसार पठाण, अशोक पवार, नानासाहेब चव्हाण, नितीन बारगळ, पवन बारगळ, चंद्रशेखर देशमुख, प्रताप काळे, दीपक चव्हाण, रामेश्वर भुसारे, दत्ता जाधव, अनिल दळे, रामेश्वर जाधव, सचिन गायके, गणेश देशमुख यांच्यासह आदींची उपस्थिती होती.

# कार पुलावरून कोसळली; व्यापाऱ्याचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदनगर :** जामखेड येथील भांड्याचे व्यापारी महेंद्र बोरा आपल्या कुटुंबीयांसह राजस्थानात देवदर्शनासाठी गेले होते. तेथून ते विमानाने पुण्यात सुखरूप परतले. त्यानंतर बोरा यांनी जामखेडपर्यंतचा प्रवास कारमधून सुरू केला. घर काही किलोमीटर अंतरावर असतानाच एका अवघड वळणावरील पुलावर त्यांची कार उलटली आणि पुलावरून खाली कोसळली. यामध्ये व्यापारी महेंद्र बोरा यांचा मृत्यू झाला तर कुटुंबातील तिघे जखमी झाले आहेत. भांड्याचे व्यापारी महेंद्र शांतिलाल बोरा (वय ५८) काही दिवसांपूर्वी आपल्या कुटुंबासमवेत राजस्थानात देवदर्शनाला गेले होते. काल रात्री ते विमानाने पुणे विमानतळावर पोहोचले. तेथून सर्वजण त्यांच्या वाहनातून जामखेडकडे निघाले. सकाळी त्यांची कार नगर-जामखेड रोडवरील पोखरी फाट्याजवळ आली. तेथील पुलावर कार पलटी होऊन कोसळली. यामध्ये महेंद्र बोरा यांचे निधन झाले असून त्यांची पत्नी रेखा महेंद्र बोरा (वय ५२), सून जागृती भूषण बोरा (वय २८) व नात लियाशा भूषण बोरा (वय ६) हे गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना उपचारासाठी नगरच्या रुग्णालयात हलवण्यात आले. मुलगा भूषण शांतिलाल बोरा किरकोळ जखमी झाला आहे.



# पंतप्रधान शरीफ चीन दौऱ्यावर

आधुनिक केसरी

पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ मंगळवारपासून दोन दिवसीय बीजिंग दौऱ्यावर आहेत. चीनचे अध्यक्ष क्षी जिनपींग यांनी तिसऱ्यांदा पदभार स्वीकारल्यानंतर चीनला भेट देणारे शरीफ पहिलेच परदेशी नेते आहेत. शरीफ यांचे सरकार आणि पाकिस्तान लष्कर अमेरिकेशी असलेले संबंध सुधारण्याच्या प्रयत्नात असताना शरीफ-जिनपींग भेट महत्त्वाची मानली जात आहे. माजी पंतप्रधान इम्रान खान यांच्या अमेरिकाविरोधी प्रचाराचा फटका पाकिस्तान-अमेरिका संबंधांना बसला आहे. पाकिस्तानची सत्ता गमावण्याच्या दोन महिन्यांआधी तत्कालीन पंतप्रधान इम्रान खान यांनी यावर्षी फेब्रुवारीमध्ये विदेश दौरा केला होता. ते बीजिंग हिवाळी ऑलिंपिकच्या उद्घाटनासाठी गेले होते. त्यानंतर लगेचच खान यांनी मॉस्कोलादेखील भेट दिली होती. पुतिन यांनी युक्रेनवर केलेल्या हल्ल्याच्या अनुषंगाने त्यांची भेट पार पडली. तेव्हापासून जगात मोठे फेरबदल झाले असून चीनसोबतच्या घनिष्ट संबंधांमध्ये समतोल साधण्याचे आव्हान पाकिस्तानसमोर आहे. आपल्या राष्ट्रीय सुरक्षा धोरणात जो बायडन सरकारने रशियानंतर चीन सर्वात मोठे आव्हान असल्याचे म्हटले आहे. त्यानंतर पाकला आर्थिक मदत पुरवणाऱ्या अमेरिका आणि चीनची मर्जी राखण्यासाठी पाककडून प्रयत्न केले जात आहे. इम्रान खान यांचे सरकार सत्तेत असताना आणि आता शरीफ यांचेही चीनकडून आर्थिक मदत मिळवणं हे द्वीपक्षीय पातळीवर समान उद्दिष्ट आहे. 'चीन-पाकिस्तान इकॉनॉमिक कॉरिडॉर'च्या अटींबाबत चीनकडून पुन्हा चर्चा करण्यात येईल, अशी खान यांना अपेक्षा होती. पाकिस्तानचे आर्थिक संकट कमी करण्यासाठी बीजिंगमधून आर्थिक मदत मिळवण्याचाही त्यांचा प्रयत्न होता. या दोन्ही मागण्यांबाबत त्यांना अपयश आले. पाकिस्तानला आर्थिक मदत देण्यासाठी आणखी वाटाघाटींची गरज असल्याचे चीनकडून स्पष्ट करण्यात आले होते. अटींची पुर्तता करू न शकल्याने इम्रान खान सरकारच्या काळात रद्द करण्यात आलेले 'आयएमएफ'चे पॅकेज पुन्हा मिळवण्यात शरीफ सरकारला यश आले आहे. एवढंच नव्हे तर या पॅकेजमध्ये ६ अब्ज डॉलर्सवरून ६.५ अब्ज डॉलर्सपर्यंत वाढ करण्यात आली आहे. कर्जाच्या परतफेडीचा हफ्ता चुकवण्याचे टाळण्यासाठी 'आयएमएफ'ने पाकिस्तानला ऑगस्टमध्ये १.१ अब्ज डॉलर्सची मदतही केली होती. 'सीपीईसी' प्रकल्प पाकिस्तान सरकारसाठी अत्यंत महत्त्वाचा प्रकल्प आहे. उद्योग, ऊर्जा, कृषी, रेल्वे, रस्त्यांचे जाळे आणि ग्वादार बंदर विकास कामाचा या प्रकल्पात समावेश आहे. ६७ अब्ज डॉलर्सच्या या प्रकल्पाला चीनकडून आर्थिक सहाय्य करण्यात येत आहे. याबाबत चीनच्या काही अटींवर पाकिस्तान सरकारला आक्षेप आहे. संयुक्त राष्ट्राच्या सुरक्षा परिषदेत पाकिस्तानी दहशतवाद्यांवर निर्बंध लावण्याचे प्रयत्न रोखून चीन पाकिस्तानची पाठराखण करत आहे. सध्या पाकिस्तानात मोठी राजकीय उलथापालथ सुरू असून या पार्श्वभूमीवर शरीफ यांची भेट महत्त्वाची मानली जात आहे. माजी पंतप्रधान इम्रान खान यांच्याकडून 'आयात सरकार' म्हणून शरीफ सरकारचा उल्लेख वारंवार केला जात आहे. आपल्याला सत्तेतून खाली खेचण्यासाठी अमेरिका जबाबदार असल्याचा आरोपही त्यांच्याकडून करण्यात आला आहे. पाक सरकारच्या परराष्ट्र धोरणांवरही खान यांच्याकडून सातत्याने टीका केली जात आहे. अशा परिस्थितीत चीनसोबत असलेले संबंध दृढ करण्याचे प्रयत्न शरीफ सरकारकडून केले जात आहेत.

# मराठी बांधवांवर अन्याय तरी महाराष्ट्र शांत कसा ?



कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

आधुनिक केसरी

**महाराष्ट्रातील मराठी भाषिक नेत्यांची सत्ता संघर्षात गर्क आहेत. केंद्रातील काँग्रेस सरकार असताना जे केले, तेच आता केंद्रातील व कर्नाटक व महाराष्ट्रात भाजपाची सत्ता असतानाही मराठी भाषिकांना न्याय देत नाही. यासाठी केंद्र, महाराष्ट्र व कर्नाटक सरकारे असंवेदनशील आहेत, असे म्हणणे चुकीचे ठरणार नाही. कारण ६६ वर्षापासून मराठी भाषिकांवर कन्नडी सरकार सक्ती व दडपणाखाली आहेत. महात्मा गाधी यांनी १९२० मध्ये नागपूरच्या आंदोलनत प्रांतरचनेचा प्रस्ताव मांडला होता.या प्रस्तावाला काँग्रेस पक्षाने मान्यता दिली होती. १९५३ मध्ये आंध्रप्रदेश राज्याची निर्मिती केली गेली. त्याच धर्तीवर मराठी भाषिक राज्याची निर्मिती करावीअशी मागणी होती.**

कर्नाटक राज्याचा १ नोव्हेंबर हा स्थापना दिवस. या दिवशी बेळगावच्या मराठी बांधवांनी हातात काळे झेंडे घेवून निषेध मिरवणूक काढली होती. कारण १९५६ पासून कर्नाटक राज्यातील मराठी बांधव महाराष्ट्रात येण्यासाठी लढा देत आहेत. सद्याचे कर्नाटक राज्य म्हणजे पूर्वीचे म्हैसूर हे राज्य आहे. देशाच्या स्वातंत्र्यानंतर १९४८ मध्ये भारतातील प्रथम म्हैसूर राज्याची निर्मिती झाली. त्यानंतर कन्नडी भाषेच्या अस्मितासाठी १ नोव्हेंबर १९७३ मध्ये म्हैसूर राज्याचे नाव बदलून कर्नाटक राज्य असे नामांत्तर करण्यात आले. तेंव्हापासून १ नोव्हेंबरला कर्नाटक राज्याचा वर्धापन दिवस म्हणून साजरा केला जातोय! तर दुसरीकडे कन्नड सरकार हे मराठी भाषिकांच्या आपल्या छातीवर पाय देऊन वर्धापनदिन साजरा करत आहे.हा राग मराठी बांधवात आहे. त्यामुळे ते हा दिवस निषेध दिन म्हणून साजरा करत असतात. भारतीय स्वांतत्र्याचा अमृत महोत्सवाबरोबर हैद्राबाद मुक्ती दिन साजरा करत आहेत, पण दुसरीकडे आपलेच मराठी बांधवांना कर्नाटक राज्यात अन्यायाच्या विरोधात लढा देत आहेत, याची मराठी भाषिक महाराष्ट्र राज्याला खंतही वाटू नये याचे आश्चर्य वाटते.महाराष्ट्रातील मराठी भाषिक नेत्यांची सत्ता संघर्षात गर्क आहेत. केंद्रातील काँग्रेस सरकार असताना जे केले, तेच आता केंद्रातील व कर्नाटक व महाराष्ट्रात भाजपाची सत्ता असतानाही मराठी भाषिकांना न्याय देत नाही. यासाठी केंद्र, महाराष्ट्र व कर्नाटक सरकारे असंवेदनशील आहेत, असे म्हणणे चुकीचे ठरणार नाही. कारण ६६ वर्षापासून मराठी भाषिकांवर कन्नडी सरकार सक्ती व दडपणाखाली आहेत.याचा इतिहास असा आहे. भारताचा प्रांतरचनेचा इतिहास स्वातंत्र्यकाळापासून आहे. महात्मा गाधी यांनी १९२० मध्ये नागपूरच्या आंदोलनत प्रांतरचनेचा प्रस्ताव मांडला होता.या प्रस्तावाला काँग्रेस पक्षाने मान्यता दिली होती. १९५३ मध्ये आंध्रप्रदेश राज्याची निर्मिती केली गेली. त्याच धर्तीवर मराठी भाषिक राज्याची निर्मिती करावीअशी मागणी होती.तेंव्हा १९५३ मध्ये तत्कालिन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी भाषावार प्रांतपुनर्रचनेसाठी निवृत्त न्यायाधीश फाजलअली आयोगाची स्थापना केली. आयोगात ऱ्हदयनाथ कुंजरू, एम.के. पणिकर हे सदस्य होते.या आयोगाच्या अहवालानंतर १६ जानेवारी १९५६ ला बॉम्बे हे व्दिभाषिक राज्य निर्माण करण्यात आले. त्यानंतर संयुक्त महाराष्ट्राचा लढा झाला. यात १०७ जणांच्या बलिदानानंतर काँग्रेस सरकारने १ मे १९६० मराठी भाषिक महाराष्ट्र राज्याची निर्मिती केली.त्याप्रमाणे याच दिवशी म्हैसूर राज्याचा विस्तार करताना विजापूर, धारवाड, गुलबर्गा बीदर, मराठी भाषिक बेळगाव जिल्हा म्हैसूर राज्याला जोडण्यात आला. यात बेळगाव शहर, निपाणी, बिदर शहरासह ८६५ बहूसंख्य मराठी असलेली




गावे म्हैसूर राज्यात समावेश करण्यात आला.त्या निर्णयामुळे बेळगावातही १७ जानेवारी १९५६ रोजी मराठी भाषिकात संतापाची लाट पसरली. लोक रस्त्यावर उतरले. बेळगाव, कारवार,निपाणी, बिदर, भालकीसह संयुक्त महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली पाहिजे अशा घोषणा देत होते. तेंव्हा पोलिसांनी गोळीबार केला. त्यात चार जण हुतात्मा झाले. तेंव्हापासून कर्नाटक राज्यातील मराठी भाषिक महाराष्ट्रात येण्यासाठी धडपडत आहेत. सेनापती बापट यांनी २२ मे १९६६ रोजी मुंबईत मुख्यमंत्र्याच्या निवासस्थानासमोर उपोषण सुरु केले होते. तेंव्हा नाथ पै यांनी यांनी या आंदोलनाची माहिती तत्कालिन पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांच्या कानावर घातली. तेंव्हा केंद्राने एक सदस्यीय महाजन समितीची नियुक्त केली. १९६७ मध्ये महाजन समितीने बेळगाव हे म्हैसूर राज्यात असणे योग्य असल्याचा अहवाल दिला होता. त्यामुळे प्रश्न अधिक चिघळला.

कर्नाटकात सुमारे ४० लाख मराठी भाषिक आहेत. त्यांचेवर कन्नड भाषेची सक्ती केली जात आहे. मराठी बांधवानी महाराष्ट्र एकीकरण समिती स्थापन करून स्थानिक राजकारणात सक्रिय भाग घेतला. या समितिचे १९५७-२ ,१९६२-५ , १९७५-६ आमदार निवडून आले होते. २०१३ बेळगाव भागातून समितीचे संभाजी पाटील हे विधानसभेवर निवडून गेले. इतकेच नव्हे या समितीने बेळगावच्या महापालिकेवर मराठीचा झेंडा फडकविला होता. पण २०२१ मध्ये मराठी माणसात फूट पडली त्याची जागा भाजपाने घेतली. त्यामुळे बेळगाव महापालिकेची सत्ता समितीच्या हातून गेली. कर्नाटक राज्यातील मराठी भाषिकावर होत अन्याय विरोधात शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार त्यावेळेसचे सेनेचे नेते छगन भूजबळ, एकनाथ शिंदे हे कर्नाटकात बंदी असताना घुसले होते.त्यात सेना नेत्यांनी तुरूंगवास भोगला आहे. शिवसेनेने मराठी भाषिकासाठी लढा दिला, हे कोणीही नाकारू शकत नाही. कर्नाटक राज्यातील मराठी भाषिकांनी अनेक आंदोलने केली, लाठ्या खाल्या, तुरूंगात गेले,गोळाबारात अनेकांनी बलिदान दिले. २९ मार्च २००४ महाराष्ट्राचे तत्कालिन मुख्यमंत्री स्व. विलासराव देशमुख यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. पण कर्नाटक सरकार न्यायालयात कागदपत्रे दाखल करत नाही. यात कर्नाटक सरकार महाराष्ट्राला एक इंचही जागा देणार नाही, अशी दर्पोक्ती मुख्यमंत्र्यांनी केली. केवळ राजकारणामुळे महाराष्ट्र -कर्नाटक सीमा प्रश्न भिजत पडलेला आहे. महाराष्ट्राच्या शेजारी असलेले कर्नाटक राज्यात भाजपा सरकार आहे, तर महाराष्ट्रात शिंदे व फडणवीस यांची सत्ता असताना ते शांत कसे बसले आहेत? असा प्रश्न विचारला जात आहे.

# उच्च शिक्षण, संशोधन काही प्रश्न काही उत्तरे

आधुनिक केसरी

**(मागील अंकावरू)**

जोपर्यंत,प्राध्यापक,संशोधक विद्यार्थी, त्यांची योग्यता, याविषयी खात्री नसेल, आपले काम होईल असा विश्वास नसेल, तर कोण लाखो, करोडो विनाकारण खर्च करेल? असा हा साधा हिशेब आहे! सरकारही विद्यापीठांना संशोधनासाठी पुरेसा निधी देत नाही. सरकारी अनुदान सारे पगारातच खर्च होते. त्यामुळे अत्याधुनिक प्रयोगशाळा, यंत्रणा, विद्यापीठाकडे उपलब्ध नसते. चार पाच टक्के प्रामाणिक, प्राध्यापक, संशोधक आपापल्या परीने काहीतरी करतात. पण एव्हढ्या मोठ्या देशासाठी, मानांकन मिळविण्यासाठी ते पुरेसे नसते. स्वातंत्र्यानंतर आपल्याकडे एकही डॉ. जे. सी. बोस, डॉ. रामन, डॉ. चंद्रशेखर, डॉ. रमानुजम पैदा झाला नाही हे कटू सत्य. देशातील अनेक प्रयोग शाळातील,लाखो रुपये मासिक पगार घेणारे, वैज्ञानिक, संशोधक (सन्माननीय अपवाद सोडून) नेमके कोणते संशोधन करतात, त्याचा जगाला, समाजाला किती उपयोग झाला, याचे ऑडिट केले पाहिजे! म्हणजे खरे सत्य बाहेर येईल.एकमेकाचे पाय ओढणे, घाणेरडे राजकारण करणे, टाईम पास करणे, सवलतींचा दुरुपयोग करणे, परिषदा अटेंड करण्याच्या निमित्ताने परदेश वाऱ्या करणे, हेच उद्योग चालू असतात. आपले प्रकाशित पेपर्स (काही अपवाद वगळल्यास) फालतू दर्जाचे असतात हेही सर्वेक्षणात सिध्द झाले आहे!

उचलेगिरी,राजकारण, स्पर्धा हे सारे प्रकार परदेशातही आहेत. पण अल्प प्रमाणात. आपल्या तुलनेत व्यस्त प्रमाणात. तिकडे उद्योग क्षेत्र, राष्ट्रीय संशोधन संस्था, प्रयोगशाळा अन् विद्यापीठे यांच्यात चांगला समन्वय आहे. त्यांचे नाते परस्पर विश्वासाचे आहे. त्यामुळे विद्यापीठातील प्राध्यापकांना भरपूर अनुदान मिळते. शिष्यवृत्त्या मिळतात. त्यातून समाजोपयोगी संशोधन होते. अगदी युरोपातल्या लहान विद्यापीठात सुध्दा डझनभर नोबेल विजेते सहज असतील. पण आपल्या १३० कोटी लोकसंख्या असलेल्या देशात स्वातंत्र्यानंतर किती जणांना नोबेल मिळाले? कुठे आहे मूलभूत संशोधनातला आपला प्रभाव? ह्याचा गांभीर्याने विचार व्हायला हवा.

**ही परिस्थिती बदलण्यासाठी काय करता येईल?**

केवळ नव्या शैक्षिणक धोरणाचे अहवाल प्रसिध्द करुन काही साध्य होणार नाही. कागदावर, सारे काही छान असते. आपले संविधान, आपले कायदे, आपली लोकशाही, आपली न्याय प्रणाली हे सारे कागदोपत्री किती छान छान आहे. पण प्रत्यक्षातली परिस्थिती वेगळीच दिसते. या खालील गोष्टी तातडीने करता येतील :

१) शाळेचे, कॉलेज, विद्यापीठाचे अभ्यासक्रम तातडीने बदलावे लागतील. झालेले बदल पुरेसे नाहीत.शिकवण्याऐवजी शिकण्यावर भर हवा. सातत्याने नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात केले पाहिजे.

२) कृतीवर जास्त भर हवा. वाचन, लेखन पुरेसे नसते. त्यातले काय, किती समजले, आत झिरपले हे जास्त महत्वाचे. आपण जे शिकतो ते कशासाठी, त्याचा कुठे काय उपयोग होऊ शकतो हे कृती तून समजायला हवे. वेगवेगळे स्किल्स यायला हवेत. भाषेवर प्रभुत्व हवे. मातृभाषा नीट यायला हवी इतर भाषांचे ज्ञान हवे. बोलण्यातून, लेखनातून आत्मविश्वासपूर्वक व्यक्त होता आले पाहिजे.

३) मूल्यमापन पद्धत मुळापासून बदलायला हवी. ठराविक प्रश्नांची, ठराविक वेळेत, ठराविक उत्तरे ही ठोकळेबाज पद्धत आता कुचकामी ठरते आहे. परीक्षेचे भय नको. ताण नको. शिकणेच नव्हे तर परीक्षासुध्दा एन्जॉय केली पाहिजे मुलांनी. सातत्याने कळत नकळत मूल्यमापन व्हावे. मुलाचे चारित्र्य, स्वभाव, त्यांचे इतराशी वागणे, बोलणे, मिळून मिसळून काम करण्याची तयारी, नीती मूल्य हे सारे वेग वेगळ्या कोनातून, कृतीतून तपासावे. त्याच्या पारदर्शक नोंदी ठेवाव्या. सुधारणेला वाव, प्रोत्साहन असावे.चुका करत शिकण्याचे स्वातंत्र्य असावे.

४) दर्जात, गुणवत्तेच्या बाबतीत तडजोड नको. शिथिलता नको. भेदाभेद नको.

५) शिक्षण, संशोधन या क्षेत्रांत सरकारची लुडबुड नको. सरकारने फक्त अनुदान देण्याचे, प्रोत्साहन देण्याचे काम करावे.

६) पदवी अन् नोकरी, जॉब अन् करियर हे डी लिंक करावे. नोकरीत स्किल्स, कौशल्य, चारित्र्य, जिद्द, महत्वाकांक्षा हे सारे महत्वाचे असते. संशोधनदेखील फक्त पदवीसाठी करायचे नसून, समाजासाठी, विकासासाठी, ज्ञान वृधीसाठीच करायचे असते ही भूमिका हवी. हे संशोधन जागतिक पातळीवर मान्यता पावणारे, दर्जेदार, समाजोपयोगीच हवे.

७) मातृभाषेतून सर्व ज्ञान शाखेच्या उत्कृष्ठ ग्रंथाचे अनुवाद, नवी, सुलभ पुस्तके यांची तातडीने निर्मिती व्हावी. या कामात दर्जाच्या बाबतीत तडजोड नको.

८) शिक्षण, संशोधन, मूल्यमापन, अध्यापन या सर्व प्रक्रिया आनंददायी असाव्यात. त्यात कुठेही ताण तणाव नसावा.

९) व्यावसायिक नीतिमत्ता, चारित्र्य संपन्नता, राष्ट्रीयत्व, कायद्याविषयी आदर, समाजभान यावर शिक्षणात भर हवा. या प्रत्येक अंगाचे सातत्याने मूल्यमापन व्हावे. जात, धर्म, लिंग भेद न करता सर्वांना समान न्याय, समान संधी देणारी प्रक्रिया प्रत्येक पावलावर काटेकोरपणे राबवावी. कुणावरही अन्याय होता कामा नये.

१०) आर्थिक किंवा इतर तत्सम कारणामुळे कुणीही वंचित राहता कामा नये असे धोरण सरकारने सर्व पातळ्यांवर राबवावे.

आणखीनही बरेच काही करता येईल. पण एव्हढे जरी केले तरी पुरे! पाऊल उचलले की पाऊलवाट आपोआप तयार होते.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# 'अविनाशपासष्टी' : गझलसमृद्धीचा सम्यक विचार मांडणारा गझलसंग्रह

आधुनिक केसरी

**गझलकार डॉ.सांगोलेकर यांनी गझलचळवळ वृद्धिंगत व्हावी, अशी मनोमन इच्छा व्यक्त करून त्यामध्ये गझलकारांमधील गटतट आणि गझलराजकारण यांच्या अडचणी निर्माण होऊ नयेत, याकडे लक्ष वेधून त्यावर सूचक भाष्यही केलं आहे. एकूणच मराठी काव्यविश्वात गझल अधिक समृद्ध होण्यास आपण सारेच जण हातभार लावू शकतो, असा सम्यक विचार व विश्वास अधोरेखित करणारा हा गझलसंग्रह असल्यानं तो अनेक भावी पिढ्यांना मार्गदर्शक ठरेल, अशी मला खात्री वाटते. यानिमित्तानं प्राचार्य डॉ.अविनाश सांगोलेकर यांना पुढील गझलप्रवासासाठी अनेक मंगल कामना !**


सुनील ओवाळ
दहिसर (पूर्व), मुंबई,
संपर्क क्र. : ९८६७८२७५०१

प्राचार्य डॉ. अविनाश सांगोलेकर यांच्याशी अलीकडेच भ्रमणध्वनीवरून संवाद झाला होता. निमित्त होतं ' महाराष्ट्र टाइम्स ' मध्ये त्यांनी लिहिलेली 'संवाद' सदरातील समीक्षा. प्रा. डॉ. बाळासाहेब लबडे यांच्या 'एक कैफियत ' या गझलसंग्रहाचा त्यांनी त्यात परिचय करून दिलेला होता. वृत्तपत्रात त्यांचा भ्रमणध्वनी क्रमांक मला मिळाला होता आणि नुकताच 'ग्रंथाली'ने प्रकाशित केलेल्या त्यांच्या ' अविनाशपासष्टी ' या गझलसंग्रहाबद्दल बोललो. त्यांनी 'पत्ता पाठवा' म्हटलं आणि लगेचच पोस्टानं मला गझलसंग्रहही पाठवला. मनःपूर्वक धन्यवाद, सर!

डॉ. अविनाश सांगोलेकर हे नाव मी तसं खूप आधीच ऐकलेलं, वाचलेलं होतं.त्यांनी मराठी गझलेवर एम. फिल. आणि पीएच. डी. केलेली मला ज्ञात होतं. त्यांचा गझलसंग्रह हाती पडताच तो मी अंतर्बाह्य पाहिला आणि बसल्या बैठकीत वाचूनही काढला. मुखपृष्ठावरल्या हिरव्या रंगाच्या पार्श्वभूमीवरल्या डॉ. सांगोलेकरांच्या भारदस्त छायाचित्रानं मला मोहवून टाकलं. शिवाय मलपृष्ठावरला मजकूर वाचून गझलसम्राट सुरेश भट व गझलेचे जाणकार डॉ. सुरेशचंद्र नाडकर्णी या दोघांच्या सान्निध्यात राहून डॉ. सांगोलेकरांनी केलेल्या गझलविषयक कार्याची कल्पनाही आली. प्रदीर्घ कालावधीनंतर प्रकाशित झालेला त्यांचा हा पहिलाच गझलसंग्रह अभ्यासपूर्ण चिंतनातून साकार झालेला आहे, ह्याची खात्रीच पटली.

गझलसंग्रहाला कविवर्य अरुण म्हात्रे यांची प्रस्तावना लाभलेली आहे. गझलक्षेत्रात भरीव कार्य करत आलेले जेष्ठ गझलकार डॉ. श्रीकृष्ण राऊत, जेष्ठ गझलकार प्रदीप निफाडकर, जेष्ठ गझलकार ए.के. शेख, जेष्ठ गझलगायक गझलनवाज भीमराव पांचाळे, ज्येष्ठ गझलजाणकार शाहीर सुरेशकुमार वैराळकर आणि जेष्ठ गझलकार डॉ. इक्बाल मिन्ने या दिग्गज मान्यवरांच्या पसंतीला उतरलेला हा गझलसंग्रह आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील समस्त गझलकार आणि गझलरसिकांकडून वयाच्या पासष्टीनिमित्त अविनाशजींचा झालेला हा खरा सन्मान आहे, असं मला मनोमन वाटून गेलं.

गझला वाचायला सुरुवात केल्यानंतर लक्ष वेधते ती संग्रहातली




पहिली गझल 'झटकू आता सारी मरगळ' आणि मग पुढं येणारी प्रत्येक गझल ही वाचतच रहावं, असं वाटू लागतं. सहज, सुलभ व तरल भाषेतल्या या गझला वाचताना कुठंच कंटाळा वा अडथळा येत नाही, हे या गझलसंग्रहाचं वैशिष्ट्य होय.

या गझलसंग्रहात गझलकार डॉ. सांगोलेकर यांनी केलेली शब्दयोजना ही अर्थवाही आहे. योजलेली क्रियापदं, क्रियाविशेषणं, नामं, सर्वनामं हे सर्व काही अर्थपूर्ण आहेत. 'बोलायचे तर बोल ना' , या ओळीत आलेला 'बोल ना' हा शब्दसमूह बोलण्याचा आग्रह व्यक्त करतो ; तर 'मित्रा, अरे, मी ढोल ना ' मधील 'ढोल ना ' म्हणजे ढोल नाही.इथं 'ना'ची केलेली योजना ही श्लेष साधताना दिसते. शिवाय 'ना ' ही रदीफ विलक्षण अर्थवाही वाटते. गझलकार डॉ. सांगोलेकर हे उपहासात्मक व उपरोधिक भाष्य अनेक द्विपदींमधून करतात. शिवाय 'हझल' या प्रकारातल्या दोन गझलाही या संग्रहात आहेत. छोट्या बहरात म्हणजे छोट्या वृत्तात द्विपदीची आशयघन मांडणी करणं , हे काम मोठ्या जोखमीचं असतं. मात्र ही जोखीम डॉ. अविनाश सांगोलेकरांनी मोठ्या जबाबदारीनं आणि यशस्वीपणे पार पाडली आहे. आणखीन एक महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य असं की, प्रत्येक गझलेखाली तपशील दिलेला आहे.त्यातून गझलेचं वृत्तनाम, अक्षरसंख्या, मात्रासंख्या , लगक्रम व गझललेखनाचं स्थलकाल आदी सर्व माहिती मिळते. गझलकाराचा गझलविषयक अभ्यास, चिंतन ,सामाजिक व राजकीय निरीक्षणं, बदललेली माणसं, मानवी मूल्यं , माणसाचा दिवसेंदिवस वाढणारा हव्यास, रागलोभ इत्यादींमुळे दिवसेंदिवस माणसाचे होणारे अधःपतन याविषयावरील विचार कळून येतात.

या गझलांमधून जात - धर्म- अध्यात्म यांच्या नावावर माजलेली दांभिकता, आरक्षण, ध्यानधारणा,लोकशाही, राज्यघटना, महामानव या सर्वांवर वास्तव आणि परखड भाष्य आलेलं आहे.कोरोना , दहशतवाद, निसर्गाचा होत चाललेला -हास , मानवहित आदींवरही ह्या गझला प्रकाश टाकतात. गझलकार डॉ.अविनाश सांगोलेकर यांच्या गझलविषयक प्रदीर्घ अनुभवविश्वातून व अभ्यासातून साकारलेला हा गझलसंग्रह असल्यानं तो गझलरसिकांना नक्कीच भावेल , असा मला विश्वास वाटतो.

या गझलसंग्रहातील अनेक शेर उल्लेखनीय आहेत.पैकी काही निवडक शेर उद्धृत करण्याचा मोह मला आवरता येत नाही. ते शेर असे :

१." झटकू आता सारी मरगळ !
चला उभारू नवीन चळवळ !"
२."माणूस मारणारे ते लोक कोण होते?
मूल्यास गाडणारे ते लोक कोण होते?"
३."यंत्रापुढेच सारे, हे विश्व वाकलेले,
माणूस जाणण्याचा येथे रिवाज नाही !"
४."हव्यास जास्ततेचा, हा रोग आज झाला,
थोड्यात भागणारा, माणूस शोधतो मी !"
५." वाजू कसा दोन्हीकडे ?,
मित्रा, अरे , मी ढोल ना !"
६. "लोक हो, गझलेत झाल्या खूप टोळ्या,
मात्र 'अविनाश 'च कुण्या टोळीत नाही !"
७. "शांततेसाठीच आता एकदाचे युद्ध छेडू!
माजलेल्या दहशतीला गाडण्याचे युद्ध छेडू!"
८."आजार औषधांना झाला कसे कळेना!
लकवाच यंत्रणांना झाला कसा कळेना !"
९. "आमच्या हातून झाले हे निसर्गा, कृत्य वेडे,
आणि अंती कोकिळेचे लाघवी ते सूर गेले!"
१०."माणूस माणसाला छळतो कसा कळेना!
दगडासमोर वाती वळतो कसा कळेना !"
११."पायात माणसाच्या बेड्या जुन्यापुराण्या,
शतकामध्ये नव्या तो पळतो कसा कळेना!"

गझलकार डॉ.सांगोलेकर यांनी गझलचळवळ वृद्धिंगत व्हावी, अशी मनोमन इच्छा व्यक्त करून त्यामध्ये गझलकारांमधील गटतट आणि गझलराजकारण यांच्या अडचणी निर्माण होऊ नयेत, याकडे लक्ष वेधून त्यावर सूचक भाष्यही केलं आहे. एकूणच मराठी काव्यविश्वात गझल अधिक समृद्ध होण्यास आपण सारेच जण हातभार लावू शकतो, असा सम्यक विचार व विश्वास अधोरेखित करणारा हा गझलसंग्रह असल्यानं तो अनेक भावी पिढ्यांना मार्गदर्शक ठरेल, अशी मला खात्री वाटते. यानिमित्तानं प्राचार्य डॉ.अविनाश सांगोलेकर यांना पुढील गझलप्रवासासाठी अनेक मंगल कामना !

**' अविनाशपासष्टी ' ( गझलसंग्रह) : प्राचार्य डॉ.अविनाश सांगोलेकर , ग्रंथाली , मुंबई, प्रथमावृत्ती : १५ जाने.२०२२, पृष्ठे : ९६ , मूल्य : रु.१००/-**

# गेले ते दिवस, उरल्या फक्त आठवणी



दुशांत बाबुराव निमकर
संपर्क क्र. 9765548949

आधुनिक केसरी

**आजकाल मोबाईलवर जेवढ्या प्रमाणात बोलतात तेवढ्या प्रमाणात इतरांशी संवाद प्रत्यक्षात साधत नाही हे दिसून येते. पूर्वीच्या काळी एकमेकांशी संवाद साधण्यासाठी भेटीगाठी,विचारपूस करण्यासाठी एकमेकांच्या घरी जाऊन संवाद साधत होते पण आता वाहतुकीची साधने वाढली असली तरी आपुलकीने बोलण्यासाठी वेळ नाही ही शोकांतिका वाटते आहे. अजूनही बालपणी अनुभवलेल्या बाबीची मजा आजच्या आधुनिक काळात येत नाही म्हणूनच म्हणावे वाटते की,गेले ते दिवस,उरल्या त्या फक्त आठवणी आणि आठवणीच....**

सण व उत्सव साजरे करणे म्हणजे भारतीय संस्कृतीचा एक भाग आहे. पूर्वी सण जवळ येत असतांना सर्व वस्तूची जमवाजमव करून ठेवावी लागत असे. पोळा, दिवाळी यासारखे सण मोठ्या उत्साहात आपुलकीने, प्रेमाने साजरे होत असत. दिवाळीच्या सणात तर नातेवाईकांची रेलचेल बघावयास मिळत असे. आता काळ बदलला आहे; कोणीही नातेवाईकांच्या घरी जाण्याची तसदी घेत नाही. आपुलकीची माणसे हरवल्यात झालेली आहे. सणानिमित्य गोड-धोड पदार्थ बनविण्यासाठी शेजारच्या आजी, काकू हातावरील चकल्या तयार करण्यासाठी एकमेकांच्या घरी जात असे. आपुलकीचा गोडवा वाटत होता.त्यनिमित्याने सुसंवाद घडून येत होता पण सध्या कोणालाही एकमेकांच्या घरी जाऊन मदत करावे असं वाटत नाही तसेच ज्वारी,गहू,तांदूळ बारीक करायचे असतांना कांडणी करतांना किंवा जात्यावर ज्वारी दळतांना ओव्या म्हणत होत्या. तो एक लोककलेचा भाग होता पण ते देखील कालबाह्य होतांना दिसत आहे म्हणून म्हणतो की,गेले ते दिवस,उरल्या त्या फक्त आठवणी हे अगदी खरे आहे.

भारत देश तसा खेड्यातच वसलेला आहे.संपूर्ण खेडे म्हणजे एक कुटुंब याप्रमाणे वागत होते.गावातील कोणत्याही कुटुंबात मुलाला वा मुलीला बघावयास आल्यास संपूर्ण गावाला माहिती होत असे.ज्यांच्या घरी कोणत्या वस्तूची कमी असेल त्यांनी ज्यांच्याकडे आहे त्यांच्याकडून खुर्च्या,कप,साखर,वाटी यासारख्या वस्तूची देवाणघेवाण प्रेमाने होत असे. आमच्या घरी आहे.तुम्ही घेऊन जा वा स्वतः लुगड्यात लपवून नेऊन देत असे.दुसऱ्याचे भले व्हावे हाच त्यामागील उद्देश असायचा.ज्यांच्या घरी लग्नाचा कार्यक्रम आहे त्यांच्या घरी शेजारची मुले,मुली,आई,बापडे लग्न होईस्तोवर काम करीत असायचे.पत्रावळी बनविण्यापासून तर जेवण वाढून नवरी जाईपर्यंत सर्व त्या कुटुंबातील कामे करीत असायचे.एखाद्या कुटुंबातील जावई आला की,संपूर्ण गावाचा जावई समजून त्यांना पाऊणचारासाठी बोलाविले जात असत पण सध्याची परिस्थिती लक्षात घेता शेजारच्या घरी कार्यक्रम झाला तरी माहिती पडत नाही.तो त्यांच्या मोबाईलच्या स्टेट्स वरून माहिती पडते त्यामुळे आता एकमेकांशिवाय कार्यक्रम करण्याची वृत्ती बळावलेली दिसून येत आहे.

गावातील प्रमुख व्यवसाय म्हणजे शेती होय.शेती करून कुटुंबाची गुजराण करीत असतात व उरलेले धान्य विकून संसाराचा गाडा हाकत असतात.शेतीची अवजारे वा कामे मिळून-मिसळून करीत असे.सहसा विदर्भात पूर्वी धान,ज्वारी यांचे उत्पन्न घेतल्या जात होते पण सध्या सोयाबीन,कापूस,मिरचीचे पीक घेतल्या जाते.ज्वारीवरील पाखरे हाकण्याची वा हुरडा खाण्याची आस विस्मरणात अजूनही जात नाही.धान रोवणीपासून तर कापणीपर्यंत धानाचे डीबले केल्यावर खळे करण्याची धामधूम राहत असे.अगदी थंडीच्या दिवसात धान मळणी करण्यासाठी बैलगाडीला बैलाला जुंपून रात्रभर फिरवून धान अलग केल्या जात होते.त्यावेळेस लहान मुलांना येणारी मजा मात्र हिरावली आहे.आता

धानासाठी मळणी यंत्र आल्याने ते दिवस लुप्त झालेले आहेत फक्त आठवणी अजूनही ताज्या आहेत.हिवाळ्यात जेवण आटोपल्यावर आजूबाजूच्या लेकरं,स्त्रिया एकत्र येऊन शेकोटी पेटवत असायचे.शेकोटी जवळ बसून शेतीविषयीच्या गोष्टी केल्या जात होत्या.मनोरंजनाची साधनांची अनुपलब्धता असल्याने सुसंवाद,सहकार्य अधिक चांगल्या तऱ्हेने चालत होते.गावात सहसा आजच्या सारखी वाहतुकीची साधने नसल्याने सायकल,मोटरसायकल एकमेकांना देऊन मदत करीत असायचे पण सध्या ह्या सर्व बाबी घडून येतांना दिसत नाही तसेच एखाद्याच्या घरी वा शेतात बोरे,आंबा,चिंच,सीताफळ यांची झाडे असल्यास फळे लागल्यानंतर चोरून खाण्याची मजा आज येत नाही.अश्या गावातील अनेक प्रसंग,घटना मजेशीर होत्या त्याला मात्र मुकावे लागत आहे आता त्या आठवणीच उरल्या आहेत असं म्हटलं तर चुकीचे होणार नाही.

पूर्वी गावात संदेशवहनाची साधने देखील पुरेशी नव्हती. एखाद्याच्या जवळ मोबाईल,मोटरसायकल,दूरदर्शन असले की त्यांनी सांगितलेली कामे आवर्जून लहान मुले करीत असायची आणि मोठ्या व्यक्तींचा आदर करून सांगितलेली कार्य इमानदारीने पार पाडत असे पण सध्याची परिस्थिती बघता लेकरांना एखादे काम सांगितले की,त्याकडे कानाडोळा करीत असतात. गावात असतांना मुले मैदानी खेळात रममाण असायचे.मौजमस्ती,खेळातील भांडण नेहमीचेच असायचे पण अगदी दुसऱ्या दिवशी त्यालाच बोलावत असे त्यामुळे राग,लोभ,दुरावा ही चित्र त्याकाळी दिसत नव्हती.चिंचोके,विटीदांडू, कापडी बॉल,झाडावरून उड्या मारणे,लपाछपी,टायर चालविणे यासारख्या खेळातून शारीरिक व मानसिक संतुलन टिकून राहत होते पण आजची मुले या खेळाला मुकली आहे.तंत्रज्ञानाच्या युगात एकमेकांना वेळ दिल्या जात नाही आहे.मुले स्मार्ट मोबाईलच्या दुनियेत आभासी खेळात गुंतलेले असल्याने शारीरिक तर सोडाच पण मानसिक संतुलन बिघडण्यास कारणीभूत ठरत आहेत.लहान तर सोडाच पण मोठ्या दोन वा त्यापेक्षा अधिक व्यक्ती एकत्र असले तरी त्यांच्यात सुसंवाद न होता आपापल्या मोबाईलमध्ये व्यस्त असतात.आजकाल मोबाईलवर जेवढ्या प्रमाणात बोलतात तेवढ्या प्रमाणात इतरांशी संवाद प्रत्यक्षात साधत नाही हे दिसून येते.पूर्वीच्या काळी एकमेकांशी संवाद साधण्यासाठी भेटीगाठी,विचारपूस करण्यासाठी एकमेकांच्या घरी जाऊन संवाद साधत होते पण आता वाहतुकीची साधने वाढली असली तरी आपुलकीने बोलण्यासाठी वेळ नाही ही शोकांतिका वाटते आहे.अजूनही बालपणी अनुभवलेल्या बाबीची मजा आजच्या आधुनिक काळात येत नाही म्हणूनच म्हणावे वाटते की,गेले ते दिवस,उरल्या त्या फक्त आठवणी आणि आठवणीच....

# सरकारी जुलुमाचा 'सिबिल'

आधुनिक केसरी

किशोर सांगळे

सिबिल ठीक-ठाक असेल तरच आत्ता बँका शेतकऱ्यांना कर्ज देणार आहेत म्हणे.बँकाची कर्जे बुडू नयेत आणी विलफुल डीफॉल्टर शेतकरी मंडळींना ह्यामुळे आर्थिक शिस्त लागेल हा त्यामागचा सरकारचा प्रतिपाद आहे.हे जर का झालंच तर मग एकही बँक शेतकऱ्यांना दारात उभी टाकू देईल असं वाटत नाही.कारण हप्त्याने ईएमआय भरायला शेतकऱ्याला काही पगार नाही,उघड्या आभाळाखालचा बेभरवशी धंदा आहे,म्हणून तो काही वेळेवर कर्ज फेडूच शकत




नाही.चला हो म्हणून शेतकऱ्यांना वेळेवर कर्ज फेडण्याची शिस्त ह्या नवीन निर्णयामुळे लागेल हे सरकारचं म्हणणं खरं आहे हे आपण मानूयात आणि हा सिबिलचा नियम मोठ्या मानाने मान्यही करूयात,पण काही जवाबदाऱ्या सरकारनं देखील शिस्तबद्धपणे आपल्या उरावर घ्याव्यात आणि मगच शेतकऱ्यांचा सिबिल तपासून त्याला कर्ज द्यावीत.(कर्ज कसलं कर्जभिक हो)१)सोयाबीनचे भाव प्रति क्युंटल १२००० असतात आणि शेतकऱ्याचं खळ होऊन त्यानं दाभणाने पिशव्या शिवल्या कि त्याच सोयाबीनचे भाव पाच हजार होतात हे पापही सरकारने आपल्या बोकांडीवर घ्यावं आणि मगच शेतकऱ्याचा सिबिल तपासावा.२) खाद्यतेलाची भावं रट्टाऊन वाढवा आणि त्याच कच्च्या मालाच्या धन्याला ऐन दिवाळीत किलोभर खाद्य तेलाला महाग करण्याचे करंटे धंदे बंद करा आणि मग शेतकऱ्याचे सिबिल तपासा.३)शेतमालाचे भाव महागाईच्या तुलनेने अत्यल्प कमी करा(फक्त शेतकऱ्याच्या जवळ माल असेतोवरच) आणि खतांच्या किंमती प्रचंड वाढऊन शेतकऱ्याचे बजेट नेस्तनाबुत करणं आधी बंद करा आणि मगच शेतकऱ्याचे सिबिल तपासा ४)कापसाची बोंडं पकायच्या वेळी त्या कापसाचा भाव पंधरा-वीस हजारीत असतो आणि त्याच पांढऱ्या सोन्याची भोदं घेऊन शेतकरी जेंव्हा जिनींगीत विकायला जातो तेंव्हा त्याचा भाव निर्ल्लजपणे निर्यात बंदी करून सात हजारच्या खाली आणला जातो.जगाला वस्त्र नेसवणाऱ्या कापूस उत्पादकांना भोंगळ करणारी हि आर्थिक डिझाईन आधी बंद करा आणि मगच शेतकऱ्यांचे सिबिल तपासा आणि त्याला कर्जभिक द्या.५)उघड्या आभाळाखाली बेभरवशाचा शेतीधंदा आहे म्हणून पीकविमा काढला जातो.उभ्या पिकात शेतीचा स्विमिंगपूल होऊनही कागदी नियम-फितींच्या खेळात ती विम्याची रक्कम भेटत नाही,फक्त विमाकंपन्यां तेवढ्या गब्बर होतात,हा राजरोस लुटीचा दरोडा तेवढा आधी बंद करा आणि मगच शेतकऱ्यांचे सिबल तपासून त्याला कर्जभिक द्या ६)ऐन कामाच्या मोसमात त्याच्या औताचा बैल लँपीने मरतो,शेजाऱ्या-पाजाऱ्यांच्या उसन्या बैलाने तो उशिराने उत्पादनाच्या घटीची विचकलेली पेरणी तो करतो,आधी अशी अपघाती कांडे डोक्यात घाला आणि मग शेतकऱ्यांना काय ती सिबिल तपासून कर्जभिक द्या.७) त्याला भंपक जगाचा पोशिंदा,बळीराजा,राजा,असल्या पोकळ विशेषणांनी हरभऱ्याच्या झाडावर चढऊन त्याच्या जखमेवरच्या खपल्या आधी काढणं बंद करा आणि मगच काय तो त्याचा सिबिल डोकावून पाहा.हे केल्यावर मग बघा त्याला तुमच्या भिकेचे गरज पडते का ते,आणि हो,तो इन्कम टॅक्स देखील भरेल हो!

# भक्त



स्वानंद नंदकुमार मराठे

आधुनिक केसरी

**भक्त शब्द ऐकल्यावर तुमच्या मनात अनेक नावे आली असतील त्यामधली काही नावे मीच सांगतो- हनुमान, प्रल्हाद, रावण, गोंदवलेकर महाराज, संत तुकाराम, चोखामेळा, रोहिदास, कान्होपात्रा, नामदेव, रामदास स्वामी, संत मीरा, कबीर, इत्यादी. आता हीच नावे आपल्या डोळ्यासमोर का आली? असा प्रश्न आपण आपल्या मनाला विचारला तर कदाचित तुम्हाला जाणवेल की, आजवर आपण यांच्या भक्तिची गुणगाथा कायम ऐकत आलोय.**

माणूस ही भगवंताने निर्माण केलेली सर्वात सुंदर रचना आहे असे म्हणतात. पण तोच माणूस आजकाल त्याच निर्मात्याला विसरत जातोय असे काहीसे चित्र दिसते. असो, तर या माणसाच्या आयुष्याचे मुख्यतः तीन टप्पे आपल्याला पाहायला मिळतात. बाल्यावस्था, तारुण्य आणि वृद्धावस्था असे. या तीनही अवस्थांमधील ज्ञानाची पातळीही वेगवेगळी असते. बाल्यावस्थेत माणूस अज्ञानी असतो, तारुण्यात ज्ञानी होतो पण अनियंत्रित विषय भोगात तो गुंतून राहतो आणि वृद्धावस्थेत ज्ञानी असूनही त्याला अनेक रोग जडतात व त्या ज्ञानाचा त्याला विसर पडत जातो.

प्रत्येक माणसाला एकतर मृत्यू नको असतो. आणि आलाच तर तो सुखाने यावा अशी इच्छा असते. पण खरच असे घडते का? आजवर फक्त आठच लोक चिरंजीवी झाले अश्वत्थामा, बली, व्यास, हनुमान, बिभीषण, कृप, परशुराम आणि मार्कंडेय ऋषी. पण साक्षात परमेश्वर असणारे राम आणि कृष्ण, किंवा शंकरांचा भक्त असणारा रावण ज्याने यमालाही बंदिस्त केलं होतं, इच्छामृत्यू असणारा देवव्रत म्हणजेच पितामह भीष्म या सर्वांना मृत्यू आलाच ना? तसाच आपल्या सारख्या सामान्य माणसालाही मृत्यू आहेच. पण त्याचे दुःख करत बसायचे नाही. कारण तो मृत्यू आपल्या हातात नाही. परंतु मोक्षप्राप्तीचा मार्ग मात्र आपल्या हातात आहे. आणि तो सर्वात सोपा मार्ग म्हणजे परमेश्वराची भक्ती, त्याचे नामस्मरण.

भक्ती करणारा तो भक्त असे आपण म्हणतो.

"भक्त ऐसे जाण । देही जे उदास ।
गेले अशापाश । निवारोनी ॥"

अशाप्रकारे जगद्गुरु संतश्रेष्ठ तुकारामांनी भक्ताची केलेली व्याख्या आपण वाचली असेल, ऐकली असेल. समर्थ रामदास स्वामींनी देखील भक्ताची अशीच एक व्याख्या सांगितली आहे.

"भक्त म्हणिजे विभक्त नव्हे । आणि विभक्त म्हणिजे भक्त नव्हे।"

तर हे असे भक्त होणे कोणालाही शक्य आहे. भक्त होण्यासाठी कोणतीही मर्यादा आड येत नाही. जन्मजात बाळापासून ते मृत्यूशय्येवर निजलेला सुद्धा भक्त होऊ शकतो. भगवंताचे मनापासून नाम घेणारा प्रत्येक जीव हा भक्तच आहे.

आता भक्त शब्द ऐकल्यावर तुमच्या मनात अनेक नावे आली असतील त्यामधली काही नावे मीच सांगतो- हनुमान, प्रल्हाद, रावण, गोंदवलेकर महाराज, संत तुकाराम, चोखामेळा, रोहिदास, कान्होपात्रा, नामदेव, रामदास स्वामी, संत मीरा, कबीर, इत्यादी. आता हीच नावे आपल्या डोळ्यासमोर का आली? असा प्रश्न आपण आपल्या मनाला विचारला तर कदाचित तुम्हाला जाणवेल की, आजवर आपण यांच्या भक्तिची गुणगाथा कायम ऐकत आलोय. जसे प्रल्हादाची भक्ती- कारण की साक्षात भगवंतांनी या राक्षस कुळात जन्मलेल्या भक्तासाठी नृसिंह अवतार घेतला, संत तुकारामांना न्यायला साक्षात भगवंत जमिनीवर आले आणि त्यांना सदेह वैकुंठात नेले, रामदास स्वामींना तर साक्षात प्रभू रामाचे दर्शन झाले होते, गोंदवलेकर महाराजांच्या सर्वांगात जणू श्रीरामांचा वास होता, मृत्यूनंतर हाडांमधूनही श्री विठ्ठलाचे नाव ऐकू येणारे संत चोखामेळा, हे सर्व आपण वाचले, ऐकले किंवा पाहिलेही असेल. म्हणून भक्त म्हंटल्यावर आपल्याला हे सर्वजण आठवले. पण मी आज अशाच एका भक्ता बद्दल थोडसे लिहिणार आहे, ज्याला आपण सर्व ओळखतो तो म्हणजे रामभक्त असलेला रामांचा भाऊ भरत.

भरत हा श्रीरामांचा भाऊ पण तरीही त्यांचा भक्त. आजकाल सख्खा भाऊ पक्का वैरी असे चित्र अनेक ठिकाणी पाहायला मिळते. पण इथे राम आणि भरत हे तर सावत्र भाऊ होते, तरीही मोठ्या भावासाठी स्वतःच्या जीवाची पर्वा न करता फक्त त्याग आणि समर्पण करणे हे निव्वळ अशक्यच. पण जेव्हा आपण एखाद्याचे भक्त होतो तेव्हा मात्र आपण हे सर्व अगदी सहजपणे करू शकतो.

कैकेयीला दिलेल्या वचनानुसार रामराया १४ वर्षे वनवासाला निघाले, त्यानंतर दशरथांचे प्राण गेले, भरताला राज्य देण्याचे ठरलेले परंतु रामरायांना वनवासातून परत आणून त्यांचाच राज्याभिषेक करण्याचे भरताने ठरवले. वास्तविक पाहता हे एवढे राज्य उपभोगणे भरताला सहज शक्य होते पण भरत हा रामाचा भक्त होता. जणू राम आणि भरत एक आत्मा आणि



दोन शरीर असा भास होई. हे सर्व आपण रामायणात पाहिले असेलच.

तर सांगायचा मुद्दा हा, की आपण भरताला भक्त म्हणणेच योग्य ठरेल. कारण रामाकडे असलेले सर्व गुण भरताकडे होते. म्हणूनच वनवास पूर्ण करूनच परत येईन हे रामांनी सांगितल्यावर मीही हे राज्य तुमचेच आहे आहे असे समजून सांभाळेन हे सांगणारा भरत भक्त नव्हे काय? आपल्या प्राणप्रिय भावाला वनवासात कुटीमध्ये राहावे लागते, कंदमुळे खावी लागतात, गवताच्या बिछान्यावर निजावे लागते, म्हणून सर्व राज्यसुखाचा त्याग करून भावाप्रमाणेच वस्त्रे परिधान करून, कुटीत राहणे, कंदमुळे खाणे, गवताच्या बिछान्यावर निजणे हे सर्व करणारा भरत हा भक्त नव्हे काय? या भक्ताने म्हणजेच भरताने आपले सर्वस्व श्रीरामांना अर्पण केले होते. हे समर्पण म्हणजेच प्रेम होय आणि प्रेम म्हणजेच भक्ती होय.

सतत रामनाम घेणाऱ्या भरताची भेट जेव्हा हनुमंतांशी होते. तेव्हा- हे भरता तुझ्यात साक्षात रामांचाच भास होतो असे सांगणारे हनुमंत भरताला तुझ्यापेक्षा श्रेष्ठ भक्त होणे नाही असे सांगतात. अशा या भरताने, प्रभू रामांच्या भक्ताने १४ वर्षे हे राज्य रामांसारखेच चालवले. आणि ते एका अटीवर. आणि ती अट म्हणजे "१४ वर्षे पूर्ण झाल्यानंतर एक क्षण जरी विलंब झाला तरी हा भरत अग्निकाष्ठ भक्षण करेल." यातून असे दिसते की भक्ताला भगवंताचा एक क्षणही विलंब सहन होत नाही. आणि अशी भक्ती असेल तर क्षणभर झालेला विलंब त्या भगवंतालाही सहन होत नाही. आणि तो विलंब न करता त्वरेने भक्ताकडे धावून येतो.

वनवासानंतर प्रभू श्रीरामांनी राज्य केले. त्याला आपण रामराज्य म्हणतो कारण ते एक आदर्श राजा होते. पण तेच राज्य रामाचेराज्य म्हणून १४ वर्षे सांभाळल्यावरही त्याला भरतराज्य न म्हणता, सर्व प्रजा रामराज्य म्हणते. याचाच अर्थ जसा ईश्वर तसाच भक्त नव्हे काय.

मी आधी म्हटले की राम आणि भरत हे जणू आत्मा एक आणि शरीर दोन होते. पण हेच तर भगवंत आणि भक्त यांचे नाते असते. विभक्त असूनही भरत हा रामाचा भक्त होता. आणि रामराया या भक्तापासून दूर होते पण विभक्त नव्हते. इथे विभक्त म्हणजे वेगळा या अर्थाने हा शब्द वापरला आहे. नाहीतर जो भक्त नाही तो विभक्त असाही अर्थ आपण करतो. तर अशा या भक्ताची महती गावी तितकी कमीच वाटते. रामाचा भाऊ एवढीच ओळख असणाऱ्या भरताची, एक भक्त म्हणून नविन ओळख करून द्यायचा मी माझ्या मतीला जमेल तेवढा थोडक्यात प्रयत्न केला. याच भरताच्या चरणी या चार ओळी समर्पित करतो.

**गुणगान गावे किती कसे**
**भक्तश्रेष्ठ ह्या भरताचे**
**विलंब होता क्षणभराचाहि**
**व्याकुळ होई हृदय रामाचे**

हे सर्व सांगताना काही चुकले असल्यास ते माझे. जे बरोबर असेल ते रामाचे. भरत हा भक्त म्हणून सांगायचा जो प्रयत्न मी केला आहे, तो तुम्हाला पटल्यास, आवडल्यास ते सारे श्रेय श्री राम चरणी अर्पण.

# हवाई संरक्षण यंत्रणा : पश्चिम सीमेवर विशेष भर



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**काही दिवसांपूर्वी पाकिस्तान सीमेजवळील डीसा येथे आधुनिक लष्करी विमानतळ बांधण्याची घोषणा करण्यात आली होती. आता वडोदरा येथे C-295 मिलिटरी ट्रान्सपोर्ट एअरक्राफ्टचे मॅन्युफॅक्चरिंग सेंटर उभारण्याची तयारी सुरू झाली आहे. या निमित्ताने पश्चिम सीमेवरील हवाई संरक्षण रेषा मजबूत करण्यावर भर देण्यात आला आहे. डीसा पाकिस्तान सीमेपासून फक्त 130 किमी अंतरावर आहे. गरज पडल्यास भारतीय लढाऊ विमाने कोणत्याही प्रकारचा हल्ला करू शकतील, अशा पद्धतीने तयारी केली जात आहे. ते डीसाच्या नानी गावात बांधले जाणार आहे. ते बांधण्यासाठी सुमारे 935 कोटी रुपये खर्च येणार आहे.**

हा लष्करी विमानतळ 4518 एकर परिसरात पसरलेला असेल. हवाई दलाचे हे 52 वे स्टेशन असेल. हा लष्करी तळ देशाच्या सुरक्षेसाठी आणि प्रदेशाच्या विकासासाठी महत्त्वाचा मानला जातो. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या लष्करी तळाबाबत स्पष्टपणे सांगितले आहे की, पश्चिम सीमेवर कोणत्याही प्रकारच्या गैरप्रकाराला चोख प्रत्युत्तर देणे सोपे जाईल, कारण येथे हवाई दलाचे शक्तिशाली पथक तैनात असेल. संरक्षणाच्या बाबतीत याचा फायदा होईल, इतरही अनेक फायदे होतील. डीसा एअरफील्डच्या निर्मितीमुळे कच्छ आणि दक्षिणी राजस्थानमधील स्थानिक लोकांसाठी रोजगाराच्या संधी वाढतील. उड्डाण योजनेंतर्गत लोकल फ्लाइट सेवाही सुरू करता येणार आहे. हे एअरफील्ड कांडला बंदर आणि जामनगर रिफायनरीच्या पूर्वेला आहे. अहमदाबाद आणि वडोदरासारख्या विविध आर्थिक केंद्रांसाठी संरक्षण कवच म्हणून या केंद्राकडे पाहिले जात आहे. नैसर्गिक आपत्तीच्या वेळी बचाव कार्यासाठी हे केंद्र एक प्रमुख ठिकाण म्हणून विकसित केले जाणार आहे. या एअरफील्डवर जे रनवे बांधण्यात येणार आहे, त्यावर बोईंग सी-17 ग्लोबमास्टरसारखी मोठी विमानेही उतरवता येणार आहेत. डीसा एअरबेस वायुसेना (आयएएफ) च्या दक्षिण-पश्चिम कमांडचा एक रणनीतिक एअरबेस म्हणून विकसित केला जात आहे. येथून गुजरात, राजस्थान आणि महाराष्ट्र - तिन्ही राज्ये संरक्षित केली जाऊ शकतात. संरक्षण तज्ज्ञांच्या मते, याच्या निर्मितीमुळे भारतीय हवाई दलाच्या लढाऊ विमानांची क्षमता आणि श्रेणी मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. त्याच्या निर्मितीमुळे भारतीय हवाई दलाच्या इतर शेजारील तळांनाही फायदा होईल. गुजरातमधील भुज आणि नलिया, जोधपूर, जयपूर आणि राजस्थानमधील बारमेर - सर्व केंद्रे आपापसात धोरणात्मक समन्वय प्रस्थापित करू शकतील. सध्या डीसा एअरफील्डवर एकच धावपट्टी आहे. ते सुमारे 1000 मीटर लांब आहे. त्यावर सध्या नागरी आणि खासगी विमाने उतरवली जातात. किंवा हेलिकॉप्टर उतरवले जातात. विकासाच्या पहिल्या टप्प्यात विमानतळावर धावपट्टी, टॅक्सीवे आणि एअरक्राफ्ट हँगर्स असतील. दुसऱ्या टप्प्यात इतर



तांत्रिक पायाभूत सुविधा निर्माण केल्या जातील. गेल्या वर्षी सप्टेंबरमध्ये टाटा समूहाने वडोदरा येथे सी-295 लष्करी वाहतूक विमानाच्या निर्मिती प्रकल्पासाठी युरोपियन कंपनी एअरबससोबत 21,935 कोटी रुपयांचा करार केला होता. येथे 40 सी-295 वाहतूक विमाने तयार केली जाणार आहेत. या करारानुसार, सप्टेंबर 2023 ते ऑगस्ट 2025 दरम्यान उड्डाणासाठी तयार असलेली 16 विमाने भारतीय हवाई दलाकडे सुपूर्द केली जातील. गेल्या वर्षी सप्टेंबरमध्ये, भारताने प्रमुख विमान निर्माता एअरबस डिफेन्स अँड स्पेसशी करार केला होता, ज्या अंतर्गत हवाई दलाच्या अप्रचलित वाहतूक विमान एव्हो-748 बदलण्यासाठी एअरबसकडून 56 सी-295 विमाने खरेदी करण्याची तरतूद होती. एव्हो विमाने 1960 च्या दशकात सेवेत दाखल झाली. या कराराअंतर्गत, एअरबस स्पेनमधील सेव्हिल येथील त्यांच्या असेंब्ली युनिटमधून 16 विमाने भारताला चार वर्षांत पूर्णपणे तयार स्थितीत सुपूर्द करेल. उर्वरित ४० विमाने टाटा ॲडव्हान्स्ड सिस्टम्स लिमिटेड (टीएएसएल) च्या सहकार्याने भारतात तयार केली जातील. त्याच वेळी, भारतातील पहिले स्थानिक पातळीवर बनवलेले सी-295 विमान सप्टेंबर 2026 पर्यंत वडोदरा उत्पादन प्रकल्पात तयार होईल. उर्वरित 39 विमाने ऑगस्ट 2031 पर्यंत तयार करण्याचे लक्ष्य आहे.

येत्या 15 वर्षांत भारताला 2000 हून अधिक लढाऊ विमानांची गरज भासणार आहे. भविष्यात इतर देशांमध्ये निर्यातीसाठी ऑर्डर घेण्याची योजना आहे. 2025 पर्यंत संरक्षण उत्पादन 25 अब्ज अमेरिकी डॉलरपेक्षा जास्त वाढवण्याचे भारत सरकारचे उद्दिष्ट आहे. संरक्षण निर्यातही 5 अब्ज अमेरिकी डॉलरच्या वर जाईल. या प्लांटमध्ये तयार होणारी मध्यम वाहतूक विमाने भारतीय हवाई दलाला पुरवली जातील. या प्लांटमध्ये तयार होणारी मध्यम वाहतूक विमाने भारतीय हवाई दलाला पुरवली जातील. याशिवाय ही विमाने परदेशी बाजारपेठेतही पाठवली जाणार आहेत. भारतीय हवाई दल जगातील 35 वे सी-295 ऑपरेटर बनेल. आतापर्यंत, कंपनीला जगभरात 285 ऑर्डर प्राप्त झाल्या आहेत, त्यापैकी 200 हून अधिक विमाने वितरित करण्यात आली आहेत. हे ऑर्डर 34 देशांतील 38 ऑपरेटरकडून आले आहेत. सन 2021 मध्ये सी-295 विमानाने पाच लाखांहून अधिक उड्डाण तास नोंदवले आहेत. हे एअरबस वाहतूक विमान पहिल्यांदाच युरोपबाहेरील देशात बनवले जाणार आहे. भारतीय हवाई दलासाठी निश्चित केलेल्या 56 विमानांचा पुरवठा केल्यानंतर, एअरबसला प्लांटमध्ये उत्पादित केलेली विमाने इतर देशांतील नागरी एअरलाइन ऑपरेटरना विकण्याची परवानगी दिली जाईल. मात्र, इतर देशांमध्ये या विमानांना मान्यता देण्यापूर्वी एअरबसला भारत सरकारकडून मान्यता घ्यावी लागेल. संरक्षण विशेषज्ञ ब्रिगेडियर (निवृत्त) व्ही महालिंगम म्हणतात की, लहान किंवा अपूर्ण तयार हवाई पट्ट्यांमधून ऑपरेट करण्याची सिद्ध क्षमता असलेल्या, सी-295 चा वापर 71 सैनिक किंवा 50 पॅराट्रूपर्सच्या सामरिक वाहतुकीसाठी आणि सध्या जड विमानांसाठी उपलब्ध नसलेल्या ठिकाणी लॉजिस्टिक ऑपरेशनसाठी केला जातो. डीसाचा लष्करी विमानतळ हा हल्ले करणारे नव्हे तर बचावात्मक तळ असेल. डीसा निर्मितीमागील प्रमुख कारण म्हणजे जामनगरच्या रिलायन्स ऑईल रिफायनरीची सुरक्षा. दोन वर्षांपूर्वी लडाखमध्ये चीनशी झालेल्या संघर्षानंतर भारत आपल्या हवाई दलाचे मोठ्या प्रमाणावर आधुनिकीकरण करण्यात गुंतला आहे.

# जगात सत्तांतरांचे वारे

आधुनिक केसरी

ब्रिटनमध्ये नुकतेच सत्तांतर झाले असून भारतीय वंशाचे पहिले व्यक्ती आणि भारताचे जावई ऋषी सूनक हे ब्रिटनचे नवे पंतप्रधान बनले आहेत. ब्रिटन नंतर सर्व जगाचे लक्ष लागले होते ते ब्राझीलकडे कारण ब्राझीलमध्येही राष्ट्राध्यक्षपदाची निवडणूक लागली होती आणि या निवडणुकीत अती उजवे आणि अती डावे यांच्यात लढत होती. या निवडणुकीचा निकाल नुकताच निकाल लागला असून ब्राझीलमध्येही ब्रिटनप्रमाणे सत्तांतर झाले असून डाव्या विचारांचे कट्टर समर्थक लुईझ ईनशीओ लूला डी सिल्वा हे ब्राझीलचे नवे सत्ताधीश बनले आहेत. लूला डी सिल्वा यांनी ब्राझीलमध्ये नुकत्याच झालेल्या राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीत अती उजव्या विचारांचे जैर बोलसोनोरो यांचा पराभव केला. बोलसोनोरे यांच्या समर्थकांसाठी हा मोठा धक्का होता कारण बोलसोनोरे यांची ब्राझीलवर एकहाती हुकूमत होती. २०१८ साली झालेल्या निवडणुकीत बोलसोनोरे यांच्या पक्षाने एकहाती विजय मिळवत लूला डी सिल्वा यांच्या पक्षाचा दारुण पराभव केला होता. विशेष म्हणजे २०१८ साली जेंव्हा ब्राझीलमध्ये निवडणूक झाली त्यावेळी लूला डी सिल्वा हे तुरुंगात होते. ब्राझीलीयन बांधकाम व्यावसायिकांकडून लाच स्वीकारल्या प्रकरणी ब्राझीलीयन न्यायालयाने त्यांना दोषी ठरवत तुरुंगवासाची शिक्षा सुनावली होती. २०१८ सालची निवडणूक ही याच मुद्द्यावर लढवली गेली आणि अती उजव्या पक्षाने लूला डी सिल्वा यांच्या भ्रष्टाचाराचा मुद्दा बनवून ती निवडणूक जिंकली होती. निवडून आल्यानंतरही त्यांनी भ्रष्टाचारावर कडा प्रहार केला होता त्यामुळे तेच विजयी होतील अशी शक्यता व्यक्त केली जात होती त्यामुळेच या निकालावर आश्चर्य व्यक्त होत आहे. पराभूत उमेदवार आणि माजी राष्ट्राध्यक्ष जैर बोलसोनोरे यांनीही हा निकाल मान्य केला नसून पराभवाचे खापर इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रणेवर फोडले आहे. ब्राझीलच्या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रणेवर विश्वास ठेवता येणार नाही असे म्हणत त्यांनी लूला डी सिल्वा यांना थेट चोर असे संबोधले आहे. एकूणच या निवडणुकी नंतर ब्राझीलमधील राजकीय वातावरण बिघडले आहे. ब्राझीलमधील राजकारणात या पुढच्या काळातही राजकीय संघर्षाच्या ठिणग्या पडतच राहणार आहे. जैर बोलसोनोरे यांच्या समर्थकांना हा पराभव पचवणे जड जात असतानाच लूला डी सिल्वा यांच्या समर्थकांचा आनंद गगनात मावत नाही. लूला डी सिल्वा यांनी राष्ट्राध्यक्ष पदाची निवडणूक जिंकली असली तरी त्यांच्या पक्षाला मात्र संसदेत पूर्ण बहुमत मिळाले नाही. ब्राझीलमध्ये अध्यक्षीय निवडणूक पद्धत आहे. आपल्याकडे ग्रामपंचायतीसाठी जशी निवडणूक झाली म्हणजे थेट जनतेतून सरपंच तशी ती निवडणूक होती. यात लूला डी सिल्वा तर जिंकले मात्र संसदेत बहुमत आहे ते गैर बोलसोनोरे यांच्या पक्षाचे त्यामुळे लूला डी सिल्वा यांनी घेतलेल्या निर्णयाला जैर बोलसोनोरे यांच्या पक्षाकडून कडाडून विरोध होण्याची शक्यता आहे.

**-श्याम ठाणेदार, दौंड, जिल्हा पुणे**




# गोव्यातील साहित्यिकांना दिल्लीत दाद

## केंद्रीय साहित्य अकादमीच्या वतीने कविसंमेलन

आधुनिक केसरी न्यूज

**पणजी :** साहित्य अकादमी, नवी दिल्ली येथे शुक्रवारी झालेल्या कविसंमेलनात गोव्यातील १४ मराठी कवी कवयित्रींनी विविध आशयघन कविता सादर करून मान्यवरांची दाद मिळविली. राष्ट्रीय कवी प्राचार्य देविक रमेश यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कवी संमेलनात हिंदीतील सुप्रसिध्द कवी अलका सिन्हा (प्रजासत्ताक दिनी निघणाऱ्या संचलनाचे समालोचन करणाऱ्या) व कमलेश भट्ट कमल यांनीही यावेळी आपल्या हिंदी कवितांनी सगळ्यांना प्रभावित केले.

गोमंतकीय कवी मंडळी पैकी प्रकाश क्षीरसागर, पौर्णिमा केरकर, रजनी रायकर, शुभदा च्यारी यांनी हिंदी कविता सादर केल्या. इतरांनी मराठी कविता सादर केल्या. त्यात ज्येष्ठ कवी माधव सटवाणी, दशरथ परब (इन्स्टिट्यूट मिनेझिस ब्रागांझा चे अध्यक्ष) चित्रा क्षीरसागर, कालिका बापट, आसावरी कुलकर्णी, नितीन कोरगावकर, दीपा मिरिंगकर, शर्मिला प्रभू, समृद्धी केरकर व नागपूर येथील प्रसिद्ध लेखिका विजया मारोटकर यांचा समावेश होता. दशरथ परब यांनी व कालिका बापट यांनी आपल्या कविता गाऊन सादर केल्या व रंगत आणली. माधव सटवाणी यांनी सादर केलेल्या गझलला उस्फूर्त दाद मिळाली. प्राचार्य देविक यांनी या कविसंमेलनाने आनंद मिळाल्याचे सांगितले. साहित्याचा संबंध भावनांशी असतो. कविता सदैव जीवंत असते, कारण त्यात एक मन असते असे सांगून देविक रमेश यांनी, सर्व भारतीय भाषातील साहित्य इंग्रजी नव्हे तर हिंदीत अनुवादित होण्याची गरज प्रतिपादिली.मानवता केवळ साहित्यात उरली आहे आणि मानवता वाचविण्यासाठी लेखक, कवी रचना करतात ही मोठी गोष्ट आहे असे ते म्हणाले. त्यांच्या व अलका सिन्हा यांच्या कवितेला भरभरून दाद मिळाली.

> गोव्यात मोठ्या संघर्षातून कोकणी राज्य भाषा झाली मात्र एकच कोकणी वर्तमानपत्र चालते याबद्दलची वैयक्तिक खंत त्यांनी व्यक्त करून, कोकणी वाचकांची संख्या गोव्यात वाढण्याची गरज असल्याचे सांगितले.

साहित्य अकादमीचे सचिव के. श्रीनिवास राव यांनी स्वागत केले. ते म्हणाले, साहित्य अकादमी हे साहित्यिकांचे घरच आहे. इथे सगळे पदाधिकारी हे मान्यवर साहित्यिक आहेत. यावेळी दशरथ परब यांच्या हस्ते देविक रमेश, अलका सिन्हा व कमलेश भट्ट यांचा सन्मान करण्यात आला. साहित्य अकादमीचे सहाय्यक संपादक अजयकुमार शर्मा यांनी प्रास्ताविक व आभारप्रदर्शन केले.

# वीजचोरीविरोधात धडक मोहीम

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** दोन महिन्यांपूर्वी एरंडोल तालुक्यातील ज्या जवखेडा गावात वीजचोरी पकडणाऱ्या महावितरण कर्मचाऱ्याला मारहाण झाली होती; त्याच गावामध्ये मंगळवारी वीजचोरीविरोधात धडक मोहीम राबविण्यात आली, या मोहिमेमध्ये गावातील सर्व वीज कनेक्शनची तपासणी करण्यात आले. यामध्ये एकूण 51 घरांमध्ये वीजचोरी असल्याचे प्रथमदर्शनी आढळून आले. याप्रसंगी पोलिस बंदोबस्तदेखील सोबत घेण्यात आला. ही मोहीम धरणगाव विभागाचे कार्यकारी अभियंता रमेश पवार यांच्या मार्गदर्शनाखाली एरंडोल उपविभागाचे उपकार्यकारी अभियंता प्रशांत इंगळे यांच्या नेतृत्वाखाली एरंडोल उपविभागातील अभियंता व कर्मचाऱ्यांनी राबविली. यात एरंडोल शहर कक्षाचे सहायक अभियंता पी.एस. महाजन, कासोदा कक्षाचे सहायक अभियंता राहुल पाटील, एरंडोल ग्रामीण कक्षाच्या सहायक अभियंता लक्ष्मी माने, पिंपळकोठा कक्षाचे कनिष्ठ अभियंता इच्छानंद पाटील यांच्यासह सर्व जनमित्र व बाह्यस्रोत कर्मचाऱ्यांचा समावेश होता. या मोहिमेत वीजचोरी पकडण्यासोबतच गावातील जुन्या वीजतारा काढून नवीन एरियल बंच केबल टाकण्याचे कामही सुरू करण्यात आले आहे. काही भागातील काम झाले असून उर्वरित काम येत्या २ ते ३ दिवसात पूर्ण करण्यात येणार आहे. या मोहिमेमुळे या गावातील तसेच परिसरातील वीजचोरांचे चांगलेच धाबे दणाणले आहे.





# महापुरुषांचे जीवन हिमालयाएवढे उत्तुंग : डॉ. धारुरकर

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** महापुरुषांचे जीवन हे महासागरासारखे सखोल आणि हिमालया एवढे उत्तुंग असते. सरदार वल्लभभाई पटेल आणि भारतरत्न श्रीमती इंदिरा गांधी यांच्यामुळे भारत अखंड राहू शकला, असे प्रतिपादन डॉ. वि. ल. धारुरकर यांनी नारायणराव उजळंबकर ग्रंथालयातर्फे एन-४ सिडको येथे राष्ट्रीय एकात्मतेसमोरील आव्हाने या विषयावर आयोजित व्याख्यानात बोलताना त्यांनी सांगितले.

भाषणात त्यांनी दोन्ही महापुरुषांच्या जीवन चरित्रातील घटना आणि प्रसंग आणि सिद्धांतांवर प्रकाश टाकला. इतिहासातील प्रत्येक क्षण शाश्वत, चिरंतन आणि तेवढाच गतीमान असतो. त्यामुळे इतिहासापासून बोध घेऊन आपण समर्थपणे भावी वाटचाल करू शकतो, असे सूत्र त्यांनी मांडले.

या प्रसंगी ग्रंथालयाचे संचालक अशोक उजळंबकर यांनी त्यांचा परिचय करून दिला. डॉ.सूर्यकांत शिर्पेवार यांनी आभार मानले. ग्रंथालयातर्फे या प्रसंगी डॉ. धारुरकर आणि सह्याद्री वाहिनीनी सुप्रसिध्द कलावंत सुधीर कोर्टीकर यांच्या कला गुण छंदाची दखल घेऊन सुंदर मुलाखत प्रसिद्ध केली म्हणून सुधीर कोर्टीकरांचेही शाल, श्रीफल, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. विजय जोग यांन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. या प्रसंगी झालेल्या चर्चेत, प्रा. दिगंबर कळमकर, पंजाबराव देशमुख, शिंदे यांनी चर्चेत भाग घेतला. या प्रसंगी एन तीन, एन चार परिसरातील ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. निवृत्त शल्य चिकित्सक डॉ. धनावले, शिवाजीराव रामरुले, डॉ. शामसुंदर कुडे, जयप्रकाश भोयरीकर, एड. सुधीर कुलकर्णी, बडवे , गणेश महाजन , आदींची प्रमुख उपस्थित होती.

# राजभवनात होणाऱ्या परिषदेसाठी प्राचार्य मिलिंद उबाळे रवाना

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** राजभवनात राज्यपाल भगतसिंग



कोश्यारी यांच्या उपस्थितीत होणाऱ्या परिसंवादासाठी शहरातील एईव्हीपीएम महिला कॉलेजचे प्राचार्य डॉ. मिलिंद उबाळे रवाना झाले. या कार्यक्रमासाठी देशभरातून फक्त ३९ नामांकित महाविद्यालयाच्या प्राचार्यांना निमंत्रित करण्यात आले आहे.

एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या वतीने 'उच्च शिक्षणाचे आंतरराष्ट्रीयकरणः संधी आणि आव्हाने' या विषयावर एकदिवसीय परिसंवाद बुधवारी सकाळी राजभवनात आयोजित करण्यात आला आहे. या परिसंवादाच्या निमित्ताने देशभरातून फक्त ३९ नामांकित महाविद्यालयाच्या प्राचार्यांना निमंत्रण देण्यात आले असून औरंगाबाद शहरातील सिडको येथील एईव्हीपीएम महिला कॉलेजचे प्राचार्य मिलिंद उबाळे यासाठी रवाना झाले आहेत. या कार्यक्रमाला कुलपती तथा राज्यपाल भगतसिंग कोश्यारी, न्यूयॉर्कस्थित डॉ. अँटनी मुनरो, एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ.उज्वला चक्रदेव आदी मान्यवर मार्गदर्शन करणार असून यावेळी न्यूयॉर्कस्थित बीएमसीसी आणि एसएनडीटी महिला विद्यापीठामध्ये "उत्तम अकॅडेमिक आणि संशोधन प्रॅक्टिसेसच्या शेरिंग" संबंधीत करार करण्यात येणार आहे. डॉ.उबाळे यांचे रसायनशास्त्र विषयाच्या संशोधनात दीर्घ अनुभव असल्यामुळे त्यांना या परिषदेसाठी आमंत्रित करण्यात आले आहे. डॉ. उबाळे यांचे एईव्हीपीएम महिला कॉलेजच्या संचालिका डॉ. केजल भारसाखळे, पंकज भारसाखळे, प्राध्यापकवृंद आदींनी अभिनंदन केले आहे.

# झाली दिवाळी, आता परतीचा प्रवास

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** कोरोना संसर्गाच्या लाटेनंतरच्या दोन वर्षानंतरची यंदाची दिवाळी पाहुणे, मित्रमंडळींच्या आगमनाने भरभरून वाटली. निसर्गाच्या लहरीपणामुळे खरिप धोक्यात गेल्याने अस्वस्थ असलेल्या बळीराजाच्या घरचा दिपस्तंभ मात्र ओझरता प्रकाश देत असल्याचे चित्र दिसून आले. दरम्यान बाहेरगावी नौकरी, कामानिमित्त असलेल्या वर्गमित्र, स्नेहीमित्रांच्या भेटीनंतर जिव्हाळा, आत्मियता वाढत जून्या आठवणींनाही उजाळा देण्यात आला.दिवाळीचा सण म्हणजे उत्साह, ऊर्जा आणि स्नेहबंध वाढवणारा सण लक्ष्मी पूजन, पाडवा, भाऊबीज या सलग सणाच्या उत्साहातील दिवस कसे गेले याचे भानही बऱ्याच जणांना नव्हते. कोरोनाचे सावट संपल्याने यंदा पाहुणे रावळ्यांची वर्दळ वाढली होती. दिवाळी फराळांची पतंग अनेकांच्या घरी दिसून आली. मित्र-मैत्रिणांचा फराळाचा आस्वाद घेण्यासाठीचा अट्टाहास गोड झाला. लॉकडाऊनमुळे मध्यंतरी अनेकांच्या हाताला काम नव्हते.गावाकडे बस्तान बसविण्यासाठी प्रयत्नही



निष्कळ ठरल्याने पुन्हा पुणे, जळगाव, औरंगाबाद गाठलेल्या तरुण आणि कुंटुंबकत्यांनी दिवाळीची जेमतेम गोडी वाढवली आणि आता त्यांची परतीच्या प्रवासाला ओढ लागली आहे. सोयगाव तालुक्यात गावांमध्ये असणाऱ्या बसस्थानक दिवाळीची सुट्टी संपल्यानंतर परतीच्या पाहुण्यांनी मोठी गर्दी होत असल्याचे चित्र पाहवयास मिळत आहे. मित्रांच्या रंगल्या दिलखुलास गप्पा कामाच्या व्यापात मैत्रीचा दुरावा होतो की काय याची भिती असताना सोशल मिडियाने मैत्रीची जवळकता वाढवली.पण प्रत्यक्षात होणारी भेट ही जिव्हाळ्याची वाटते त्यासाठी दिवाळी सणाचा योग महत्त्वाचा ठरतो. वय वाढले तरी मित्र कंपनीच्या चच्रेतून एकत्र येऊन जुन्या आठवणी ताज्या करण्याचा प्रयत्न झाला. मोठ्या पदावर गेलेल्या सहानुभूती दाखवण्याचा प्रयत्न दिलखुलास गप्पातून झाला.

**जावई बापूची घरघुसनी**

लॉंकडाऊनच्या काळामुळे लांबणीवर पडलेले विवाह सोहळे गेल्या सहा महिन्यात जास्त प्रमाणात झाले. विवाह कार्यात कितीही भरपेरहाव आहेर असला तरी पाहुणेबापूच्या घरघुसनीचा कार्यक्रम करण्याची प्रथा पडली आहे. ती समाजसमान्य आहे की नाही यापेक्षा दोन्ही कुंटुंबातील चालीरीतीला प्राधान्य देणारी आहे. यंदा दिवाळी सणात नुकताच झालेल्या विवाह खर्चाचा भार सहन करावा लागत आहे. दरम्यान दिवाळीचा सण संपल्याने माहेरवाशींना घेऊन जाण्यासाठी बोलावणे येत आहे. त्यासाठी नवीन कपडे खरेदीसाठी सोयगाव येथे काही प्रमाणात गर्दीं दिसून येत आहे.





उमरी, (जि. नांदेड) येथील बालाजी जळबा कोरनरल्लू यांचे किराणा व जनरल स्टोअर दुकान आगीत जळून खाक झाले. यावेळी उमरी नगरपरिषद अग्निशमन दलातर्फे आग विझवण्यात आली.

# वेदांता-फॉक्सकॉनसंदर्भात फडणवीसांकडून संभ्रम

## अतुल लोंढे : आरटीआय अंतर्गत एका व्यक्तीला एका दिवसातच माहिती देण्याची विशेष मेहरबानी

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** वेदांता-फॉक्सकॉन प्रकरणी भारतीय जनता पक्षाकडून जनतेची दिशाभूल केली जात आहे. हा प्रकल्प शिंदे फडणवीस सरकारच्या नाकर्तेपणामुळेच गुजरातमध्ये गेला आहे पण त्याचे खापर मात्र महाविकास आघाडी सरकारवर फोडण्याचा केविलवाणा प्रयत्न केला जात आहे. वेदांता व वेदांता-फॉक्सकॉन हे दोन वेगळे प्रकल्प आहेत पण फडणवीसांकडून याबाबत जाणीवपूर्वक संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे, असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांनी म्हटले आहे. यासंदर्भात बोलताना अतुल लोंढे म्हणाले की, देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकार परिषदेत वेदांताच्या गुंतवणुकीसंदर्भात खोटी माहिती दिली. वेदांताचा प्रकल्प फडणवीस यांच्या काळातच आला आणि गेला, तो प्रकल्प मोबाईलचा होता तर वेदांता-फॉक्सकॉन हा १ लाख ५६ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक व १ लाख रोजगार निर्माण होणारा प्रकल्प होता, हा प्रकल्प सेमी कंडक्टरचा होता. यासंदर्भात १५ जुलै २०२२ रोजी सचिवांची उच्चस्तरिय बैठक झाली, सहा-सात विभागाच्या सचिवांचा या बैठकीत सहभाग होता. या उच्चस्तरिय बैठकीत वेदांता-फॉक्सकॉनला किती व कोणत्या सवलती द्यायच्या याचे निर्णय झाले. पाणी, वीज, जमीन, विविध कर यामध्ये सवलती देण्यावर निर्णय झाला. वेदांता-फॉक्सकॉन प्रकरणी एका व्यक्तीने माहिती अधिकाराखाली अर्ज केला व त्या व्यक्तिला विशेष जलतगती सेवा देत त्याच दिवशी संध्याकाळपर्यंत माहिती देण्यात आली. फडणवीस हे पुन्हा पुन्हा खोटे बोलण्याचा अश्लाघ्य प्रकार करत असून आरटीआय मधूनही त्यांनी तेच केले. आपल्या हातून झालेल्या चुका लपवण्यासाठी ही धडपड सुरु आहे. शिंदे-फडणवीस सरकार चुका लपवण्याचे काम करत आहे. फडणवीसांच्या काळात १६ लाख कोटींचे करार झाले होते पण १६ रुपयांचीही गुंतवणूकही आली नाही. महाराष्ट्रात पक्षीय राजकारण न करता जास्तीत जास्त गुंतवणूक व जास्त रोजगार आणले पाहिजेत, यासाठी विरोधी पक्षही सरकारला मदत करण्यास तयार आहे पण भाजपाचे राजकारण हे धर्मावर व श्रेय लाटण्याचे राजकारण आहे. तसेच १२ कोटी जनतेला धोका कसा द्यायचा हेच भाजपा व फडणवीस यांचे राजकारण आहे आणि आम्ही त्यांचा निषेध करतो, असेही लोंढे म्हणाले.



# प्रहारचे जोडे मारो आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** प्रहारचे संस्थापक अध्यक्ष तथा अपंगाचे दैवत माननीय आमदार बच्चू भाऊ कडू यांच्यावर जो रवी राणा यांनी बेताल वक्त करून बेकाधीशी रक्कम घेतल्या बाबत खोटे व मनगट आरोप केले आहेत आ. रवि राणा यांच्याकडे कसला पुरावा नसताना आ. बच्चू भाऊ कडु वरील जो आरोप सिध्द करावा, अंपगाचा दैवत, शेतकऱ्याची कैवारी आमदार बच्चू कडू वर जे खोटे नाट्य आरोप करून यांच्या माणसाच्या त्यांची प्रतिमा मलिन करण्याचे प्रयत्न केला असून तसेच  कार्यकर्त्यांच्या त्यांच्या असणारी भावना श्रद्धा दुखावली गेली आहे. मानसिक त्रास झालेला आहे रवि राणा विरुद्ध कायदेशीर गुन्हा दाखल करावा यासाठी फुलंब्री टि पाईट येथे जोडे मारो आदोलन करुन त्यांच्या पोस्टरला यावेळी सुदाम गायकवाड, विद्यार्थी संघटनेचे जिल्हाध्यक्ष कृष्णा गाडेकर, तालुकाध्यक्ष अमोल कोलते, तालुका संपर्कप्रमुख रामु खाकरे, राजेंद्र गाडेकर, रावसाहेब खिल्लारे, अमोल जाधव, बबन मालोदे, संजय भाले, दिलीप शिंदे, संजय तांदळे अनिता मंदाडे, सुवर्णा खाकरे, मंदाकिनी वाघ, ज्ञानेश्वर खाकरे, सुरेखा मेटे,विठ्ठल ब्राम्हणे, आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# ॲड. शैलजा गर्जेंचे L.L.B. LLM पूर्ण

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** पाटोदा तालुक्यातील महासांगवी सारख्या छोट्याश्या गावातील कु.शैलजा मारुती गर्जे हिने आई वडील शेतकरी कुटुंबातील असताना देखील प्रचंड जिद चिकाटीच्या जोरावर अनेक अडचणीचा सामना करत कु.शैलजा मारूती गर्जे हिने शैक्षणिक क्षेत्रामध्ये उंच अशी शैक्षणिक भरारी घेतलेली असून आपले B.SC.L.L.B.  LLM शिक्षण पुर्ण केले.तिच्या या शैक्षणिक यशामुळे पाटोदा तालुक्यातील मुली समोर एक आदर्श निर्माण झाला असून अड. कु.शैलजा मारुती गर्जे हिने पाटोदा तालुक्यातील महासांगवी गावाचे नाव नवलौकिक केले आहे.अत्यंत हालाखीच्या परिस्थितीमध्ये मारुती गर्जे ह्यानी आपल्या मुलीला शिकवले राष्ट्रसंत भगवान बाबा नेहमी किर्तना मध्ये सांगायचे जमिनी विकल्या तरी चालेल पण आपले मुल मुली खुप शिकले पाहिजे डॉक्टर,वकिल,इजिनेअर झाले पाहिजेत संत भगवान बाबाचे विचार डोळ्या समोर ठेवून मारुती गर्जे यांनी आपल्या मुला मुलीला खुप शिकवले त्यांचे खूप मोठे स्वप्न होते की आपले मुल मोठी साहेब झाली पाहिजे शैलजाने देखील नक्कीच स्वतःचे आणि आपल्या आई वडिलांचे स्वप्न पूर्ण केलेले असून कु.शैलजा गर्जे हिने B.SC.L.L.B. LLM शिक्षण पुर्ण करून पाटोदा न्यायालयात चांगल्या प्रकारे काम करत आहे.अड शैलजा गर्जे हिला वेळोवेळी मार्गदर्शन शिक्षक,तिचे आई-वडील यांचे लाभलेले आहे पाटोदा तालुक्यातील सामाजिक राजकीय शैक्षणिक धार्मिक आरोग्य प्रशासकीय औद्योगिक अशा विविध क्षेत्रातील मान्यवरांकडुन कु.शैलजा मारुती गर्जे हिच्या यशाचे कौतुक होत आहे.



# जातीच्या भिंती भिंती दूर करणे गरजेचे : प्रा. जीवन कोलते

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथील जय कलिंकादेवी शिक्षण प्रसारक संस्था यांच्या वतीने शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय कै.लक्ष्मणराव भिमराव कोलते पाटील वरिष्ठ सावळदबारा महाविद्यालयात व संत सेवालाल महाराज माध्यमिक विद्यालय देव्हारी येथे भारताच्या पहिल्या पंतप्रधान स्वर्गीय इंदिरा गांधी व भारताचे तत्कालीन केंद्रीय गृहमंत्री लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यानां प्राचार्य नारायणराव कोलते पाटील यांच्या हस्ते पुष्प वाहून अभिवादन करण्यात आले. देशाची भावी पिढी घडविण्याचे काम युवा पीढिच करू शकते. त्यांना नवनवीन तंत्रज्ञान आणि सुसंस्काराची जाणीव करून द्यावी लागते. नवयूवक भरकटले जात आहेत. सध्या धर्माचा अभिनवेश वाढला असून जातीअंताच्या भिंती दूर करणं काळाची गरज आहे, असे प्रतिपादन प्रा.जीवन कोलते( सामाजिक कार्यकर्ते ) यांनी केले आहे..पुढे आजूक म्हणाले अशी कामे करताना काही घटिंग मंडळी दूधात खडा टाकण्यात पटाईत असतात यामुळे आपणास बळ मिळत. शेतकरी सध्या संकटात सापडला आहे त्यांना ख-या अर्थाने दिलासा मिळणे महत्त्वाचे आहे. जातीपातीचे राजकारण करून वेगवेगळे झेंडे लावले जात आहेत. वृध्दा आश्रमाची संख्या दिवसेनदिवस वाढते आहे. यावर लगाम घालण्यासाठी चांगल्या संस्कारांची गरज आहे. असे प्रा जीवन कोलते यांनी सांगितले आहे. यावेळी  सूत्रसंचलन प्रा.सतीश सत्रे यांनी केले.तर प्रा.पंजाबराव शेळके यांनी आभार मानले.याप्रसंगी शाळेचे पूर्ण शिक्षकवृंद, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.





आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका
आरोग्य हीच संपत्ती आहे

शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट
महावीर
घर संसार



• घाऊक आणि किरकोळ • किराणा, सुका मेवा, मसाले
• क्रॉकरी, घरगुती उपकरणे • घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि ॲल्युमिनियम
• प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.p. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर MIDC चिकलठाणा, औरंगाबाद

# भारत जोडो यात्रेत काँग्रेस नेते नितीन राऊत जखमी

## गर्दीत धक्का लागला आणि तोल जाऊन पडले; डाव्या डोळ्याजवळ इजा

आधुनिक केसरी न्यूज

**हैदराबाद :** महाराष्ट्र काँग्रेसचे नेते आणि राज्याचे माजी मंत्री नितीन राऊत हे 'भारत जोडो' यात्रेत जखमी झाले आहेत. हैदराबाद येथील रुग्णालयात उपचार सुरू असून प्रकृती स्थिर असल्याची माहिती देण्यात आली आहे. नितीन राऊत हे हैदराबाद येथे 'भारत जोडो' यात्रेत सहभागी झाले होते. त्यावेळी गर्दीत त्यांना धक्का लागला आणि तोल गेल्याने ते पडले. त्यांच्या डाव्या डोळ्याजवळ इजा झाली आहे.

काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वात भारत जोडो यात्रा सुरू आहे. ही यात्रा तेलंगणात दाखल झाली आहे. नितीन राऊत हे राहुल गांधी यांच्यासोबत यात्रेत चालत असताना कार्यकर्ते व नागरिकांची मोठी गर्दी होती. सामान्य जनता, कार्यकर्त्यांकडून राहुल गांधी यांच्या भेटीसाठी धडपड करीत होते. या गर्दीतून मार्ग काढत राहुल यांच्या जवळ जाण्यासाठी प्रयत्न करीत होते. अशाच प्रयत्नात कुणाचा तरी राऊत यांना धक्का लागला असल्याचे सांगण्यात येत आहे. मंगळवारी रात्री सिटीस्कॅन करण्यात आले. त्यांची जखम फारशी गंभीर नसल्याची माहिती देण्यात आली. डाव्या डोळ्याजवळ जखम झाली असून डोक्याला मार लागला आहे. भारत जोडो यात्रेत सहभागी होणारी पूजा भट्ट पहिलीच बॉलिवूड सेलिब्रिटी आहे. अभिनेत्री पूजा ही हैदराबादमध्ये यात्रेत सहभागी झाली. तेलंगणातील हैदराबाद शहरातून आज



सकाळी 'भारत जोडो' यात्रा सुरू झाली. त्यावेळी अभिनेत्री पूजा भट्ट यात्रेत सहभागी झाली.

राहुल गांधी यांच्या नेतृत्वातील 'भारत जोडो' यात्रा ही 7 नोव्हेंबर रोजी महाराष्ट्रात प्रवेश करणार आहे. महाराष्ट्र प्रदेश कमिटीकडून भारत जोडो यात्रेसाठीची जय्यत तयारी करण्यात आली आहे. नांदेड जिल्ह्यातील देगलूरपासून भारत जोडो यात्रेचा टप्पा सुरू होणार आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार हेदेखील भारत जोडो यात्रेत सहभागी होण्याची शक्यता आहे. त्याशिवाय आदित्य ठाकरेदेखील यात्रेत सहभागी होणार असल्याची चर्चा सुरू आहे. 'भारत जोडो' यात्रेतंर्गत राहुल गांधी नांदेड, बुलढाणामध्ये जाहीर सभा घेणार आहेत.

# 'रिपाइं' महिला आघाडीच्या सचिवपदी ॲड. अर्चिता जोशी



आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या (आठवले) महिला आघाडीच्या महाराष्ट्र प्रदेश सचिवपदी ॲड. अर्चिता मंदार जोशी यांची नियुक्ती करण्यात आली. केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री व 'रिपाइं'चे राष्ट्रीय अध्यक्ष रामदास आठवले व महिला आघाडीच्या राष्ट्रीय अध्यक्षा सीमा आठवले यांच्या हस्ते ॲड अर्चिता मंदार जोशी यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. तसेच त्यांचा रामदास आठवले व सीमा आठवले यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. नुकत्याच झालेल्या राज्य कार्यकारिणीच्या बैठकीत महिला प्रदेश अध्यक्षा चंद्रकांता सोनकांबळे यांनी त्यांना नियुक्तीपत्र दिले. ॲड अर्चिता मंदार जोशी या पुणे बार असोसिएशनच्या विद्यमान सदस्य असून, अनेक संस्थांमध्ये कायदेशीर सल्लागार म्हणून त्या कार्यरत आहेत. तसेच अखिल महाराष्ट्रीय ब्राह्मण महासंघाच्या कार्याध्यक्षा आहेत.महिलांना न्याय मिळवून देण्यासाठी त्या कायम अग्रेसर आहेत. सर्व समाजाच्या महिलांना सोबत घेऊन त्यांचे प्रश्न सोडविण्याचा व कायदेशीर मार्गाने महिलांवरील अन्याय दूर करण्याचा प्रयत्न करणार असल्याचे तसेच 'रिपाइं' पक्षाला अधिक बळकट करण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे ॲड अर्चिता मंदार जोशी यांनी सांगितले.

# कळंकी येथे नेत्र तपासणी

आधुनिक केसरी न्यूज

**औराळा :** कन्नड तालुक्यातील कळंकी येथे ग्रामपंचायत कार्यालयात मंगळवार रोजी भव्य नेत्र तपासणी शिबीर घेण्यात आले.

शिबीराचे आयोजन भाजप जिल्हाउपाध्यक्ष संजय खंबायते, तालुका सरचिटणीस सुभाष काळे, पंचायत समिती उपसभापती सुनिल निकम यांच्या मार्गदर्शनाखाली भाजप तालुका उपाध्यक्ष अरुण थोरात, युमो. तालुका सरचिटणीस तथा उपसरपंच हरिष थोरात व डायमंड आय केअर मेडिकल फाऊंडेशन यांच्या वतीने करण्यात आले होते. शिबीरात डॉ. साहिब अख्तर, अंजली वानखेडे यांनी सुमारे पंच्चाहत्तर नेत्ररुग्णांची तपासणी करुण अल्पदरात चष्मा वाटप केले. तसेच ऑपरेशन ची अवश्यकता असलेल्या रुग्णां वरती डायमंड केअर फाऊंडेशन च्या वतीने औरंगाबाद येथे मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. या प्रसंगी सरपंच लक्ष्मण गुंजेकर, उपसरपंच हरिष थोरात, अरुण थोरात, आकाश कदम, गोकुळ थोरात, संतोष थोरात, वसंत काटे, महिपत थोरात, साहेबराव थोरात, शाईनाथ थोरात, आदी उपस्थित होते.

# साहित्यिक डॉ. धोंडोपंत मानवतकर यांना गौरव भूमिपुत्राचा पुरस्कार



आधुनिक केसरी न्यूज

**मंठा :** तालुक्यातील ग्रा.पं हेलस जि.जालनाच्या वतीने यावर्षी अनेक कर्तृत्ववान व्यक्तींच्या कार्याची दखल घेऊन गौरव भूमिपुत्राचा हा पुरस्कार दि.३० ऑक्टो. रोजी हेलस ता.मंठा येथे देण्यात आले. मंठा तालुक्यातील साहित्यिक चळवळीला जीवंत ठेवण्याचे काम मंठ्याचे साहित्यिक डॉ.धोंडोपंत मानवतकर हे गेल्या तीस वर्षापासून करत आहेत. त्यांना या अगोदर काव्ययात्री पुरस्कार, काव्यज्योत पुरस्कार, शुक्रतारा पुरस्कार, राज्यस्तरीय तिफण वाङमय पुरस्कार,समाई सेवाभावी मंठा संस्थेचा समाजभूषण पुरस्कार निळेप्रतिक बहुउद्देशीय सेवाभावी संस्था औरंगाबाद येथील समाजभूषण पुरस्कार" भीमशक्ती सामाजिक संघटना मंठाचा 'समाजभूषण पुरस्कार', परतूरचा ललितलेखनासाठीचा बी.रघुनाथ स्मृती साहित्य पुरस्कार आदि पुरस्कार त्यांना मिळालेले आहेत. डॉ. धोंडोपंत मानवतकर यांनी महाराष्ट्रातील अनेक साहित्य संमेलनात सहभाग नोंदवलेला आहे. अनेक कविसंमेलनाची अध्यक्षपदेही त्यांनी भूषविलेली आहेत. जालना जिल्ह्याच्या साहित्यिक वर्तुळात व मंठा तालुक्याच्या साहित्यिक चळवळीत त्यांचा महत्वाचा वाटा आहे. त्यांच्या साहित्यिक चळवळीने अनेक नवकवी, नवलेखक निर्माण झाले आहेत. या एकूणच कार्याची दखल घेऊन "गौरव भूमिपुत्राचा" हा पुरस्कार डॉ.धोंडोपंत मानवतकर यांना मुंबईचे प्रसिद्ध सिनेदिग्दर्शक,अभिनेते व निवेदक तसेच 'पोस्टर बॉईज व वारी विधानसभेची फेम' समीर पाटील यांच्या हस्ते देण्यात आला. यावेळी प्रसिद्ध अभिनेत्री प्रिया लक्षीकांत बेर्डे, प्रसिद्ध गायक प्रा.राजेश सरकटे, माजी आमदार धोंडीरामजी भाऊ राठोड, उद्योजक सोमनाथअप्पा साखरे, राजकीय रणनीतीकार मा.संतोष कराळे सरपंच पांडुरंग खराबे यांच्या उपस्थितीत देण्यात आलेल्या कार्यक्रमास अनेक सत्कारमूर्ती, मान्यवर व बहुसंख्य गावकरी उपस्थित होते.

# उस्मानाबाद जिल्ह्यातील शेतकऱ्यांना २०० कोटींची पीक विमा भरपाई

## भाजपा आ. राणा जगजीत सिंह यांची माहिती

आधुनिक केसरी न्यूज

**उस्मानाबाद :** जिल्ह्यातील साडेतीन लाखापेक्षा अधिक शेतकऱ्यांनी गेली दोन वर्षे दिलेल्या लढ्याला यश आले असून शेतकऱ्यांना २०० कोटींची विमा भरपाई मिळणार आहे. सर्वोच्च न्यायालयात जाऊन कायदेशीर मार्गाने सर्वसामान्य शेतकऱ्यांना न्याय मिळवून देता येतो हे यातून सिद्ध झाले आहे, असे प्रतिपादन भाजपा आ.राणा जगजीत सिंह पाटील यांनी मंगळवारी केले. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली हा लढा देण्यात आला. देशाच्या इतिहासात प्रथमच या पद्धतीने शेतकऱ्यांना पीक विमा भरपाई मिळाली आहे असेही त्यांनी सांगितले. भारतीय जनता पार्टीच्या प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. प्रदेश प्रवक्ते आसिफ भामला, महिला मोर्चा प्रदेश सरचिटणीस व प्रदेश चर्चा प्रतिनिधी दीपाली मोकाशी हे यावेळी उपस्थित होते.

आ. राणा जगजीत सिंह यांनी सांगितले की, २०२० च्या खरीप हंगामात अवकाळी पावसामुळे धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना भरपाई मिळावी यासाठी आम्ही राज्य सरकारच्या पातळीवर सातत्याने प्रयत्न केले. मात्र त्यावेळी मुख्यमंत्री असलेल्या उद्धव ठाकरे यांनी




शेतकऱ्यांच्या मागणीकडे लक्ष दिले नाही. शेतकऱ्यांना पीक विमा भरपाई मिळावी या आमच्या मागणीवर विचार करण्यासाठी राज्य सरकारकडून एक बैठकही बोलावण्यात आली नाही. शेतकऱ्यांनी या संदर्भात उच्च न्यायालयात दाद मागितली, उच्च न्यायालयाने शेतकऱ्यांच्या बाजूने निकाल दिला. या निकालाला स्थगिती मिळू नये म्हणून आम्ही सर्वोच्च न्यायालयात गेलो. सर्वोच्च न्यायालयाने आमची मागणी मान्य करत पीक विमा कंपनीला २०० कोटी रुपयांची रक्कम जमा करावयास लावली. उच्च न्यायालयाने आपला निर्णय कायम ठेवल्याने विमा भरपाई पोटी जमा करण्यात आलेल्या रकमेचे वितरण आजपासून शेतकऱ्यांना केले जाणार आहे, असेही आ. राणा जगजीत सिंह यांनी सांगितले. धाराशिव जिल्ह्यातील साडेतीन लाखापेक्षा अधिक शेतकऱ्यांना ५३० कोटी रूपयांची पिक विमा भरपाई मिळणार आहे. प्रति हेक्टर १८ हजार रुपये एवढी भरपाई मंजूर झाली आहे. त्यातील ६ हजार ६३९ रु. चा पहिला हप्ता आज, १ नोव्हेंबर रोजी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा होईल. पुढील टप्प्यातील पैसे लवकर प्राप्त करून घेण्यासाठी आपला नियोजनबद्ध लढा सुरूच राहील. याच पद्धतीने अन्य जिल्ह्यातील शेतकऱ्यांनाही पीक विमा भरपाई मिळवता येईल, त्यासाठी भारतीय जनता पार्टीतर्फे योग्य ती माहिती देऊन मार्गदर्शन केले जाईल, असेही त्यांनी नमूद केले.

# मोरबी दुर्घटनेची न्यायालयीन चौकशी करा : ममता बॅनर्जी

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी गुजरातच्या मोरबी पूल दुर्घटनेवरुन भाजपावर निशाणा साधला आहे. मोरबी घटनेचा तपास केंद्रीय अन्वेषण विभाग आणि सक्तवसुली संचालनालयासारख्या केंद्रीय तपास यंत्रणांकडे का दिला जात नाही? असा सवाल बॅनर्जी यांनी केला आहे. या घटनेची सर्वोच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली न्यायालयीन चौकशी करण्याची मागणीही बॅनर्जी यांनी केली आहे. "राजकारण महत्त्वाचं नाही, निवडणुकही महत्त्वाची नाही, तर लोकांचे आयुष्य महत्त्वाचे आहे", असे बॅनर्जी यांनी म्हटले आहे. मोरबी पूल दुर्घटनेत आत्तापर्यंत १३५ लोकांनी जीव गमावला आहे. यामध्ये ३४ लहान मुलांचा समावेश आहे. मच्छू नदीवरील हा पूल जवळपास सात महिन्यांआधी दुरुस्तीसाठी बंद करण्यात आला होता. त्यानंतर २६ ऑक्टोबरला गुजराती नववर्ष दिनी हा पूल पर्यटकांसाठी खुला करण्यात आला होता. मोरबी नगरपालिकेच्या 'फिटनेस' प्रमाणपत्राशिवाय हा पूल खुला करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. या पुलाची दुरुस्ती



आणि व्यवस्थापनाचे कंत्राट 'ओरेवा' समुहाला १५ वर्षांच्या कालावधीसाठी देण्यात आले होते.

घटनेच्या दोन दिवसांनंतरही या परिसरात बचाव कार्य सुरू आहे. दरम्यान, भाजपाशासित केंद्र सरकार पश्चिम बंगाल सरकारला कमकुवत करण्यासाठी 'ईडी' आणि 'सीबीआय'च्या माध्यमातून प्रयत्न करत असल्याचा आरोप सातत्याने बॅनर्जी यांच्याकडून करण्यात येत आहे. नागरिकत्व (दुरुस्ती) कायदा, २०१९ ला विरोध असल्याचं बॅनर्जी यांनी याआधीच स्पष्ट केलं आहे. गुजरात निवडणुकीमुळे भाजपानं हा मुद्दा लावून धरल्याचा आरोप त्यांनी केला आहे. गुजरातमधील आनंद आणि मेहसाणा या जिल्ह्यांमध्ये राहणाऱ्या अफगाणिस्तान, बांगलादेश आणि पाकिस्तानमधील हिंदू, शीख, बौद्ध, जैन, पारशी आणि ख्रिश्चन समाजातील लोकांना गृह मंत्रालयानं नागरिकत्व प्रमाणपत्र दिलं आहे.

# दुसरे अ. भा. शिव मराठी साहित्य संमेलन थाटात

## औरंगाबाद येथून ॲड. सर्जेराव साळवे यांचा निमंत्रित कवी म्हणून सहभाग

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** शिवचरण उज्जैनकर फाउंडेशन मुक्ताईनगर जिल्हा जळगाव तर्फे आयोजित दुसरे अखिल भारतीय शिव मराठी साहित्य संमेलन छत्रपती शिवाजी महाराज साहित्य नगरी आणि राजर्षी छत्रपती शाहू महाराज व्यासपीठ संजीवन नॉलेज सिटी पन्हाळा जिल्हा कोल्हापूर या ठिकाणी ३० ऑक्टोबर २०२२ वार रविवारला थाटात संपन्न झाले. या संमेलनाची सुरुवात ग्रंथ दिंडीने झाली. याप्रसंगी 25 विद्यार्थ्यांचा झांज पथक ग्रंथ दिंडी वारकरी संप्रदायाच्या निनादात ग्रंथ दिंडी भव्य स्वरूपात निघाली. यामध्ये बुलढाणा जिल्ह्यातून जेष्ठ साहित्यीक ॲड विजयकुमार कस्तुरे यांच्या मार्गदर्शनाखाली ॲड सर्जेराव साळवे, कथाकार बबनराव महामुने, शाहीर मनोहर पवार यांनी सहभागी होऊन मृदंग झांझ पथकासह सहभागी होऊन कार्यक्रम सादर केला व थाटामाटात ग्रंथदिंडीची शोभा वाढवली. सर्व साहित्यिक रसिक मान्यवरांचा सहभाग होता.

त्यानंतर उद्घाटन सत्रामध्ये भारताचे माजी राष्ट्रीय सचिव डॉक्टर ज्ञानेश्वर मुळे यांनी भ्रमणध्वनी द्वारे या संमेलना शुभेच्छा दिल्या व पुढील संमेलन हे दिल्लीमध्ये मी आयोजन करणार घोषित केले. त्यानंतर भारताचे माजी कायदामंत्री व गोवा राज्याचे माजी उपमुख्यमंत्री व भारताचे माजी कायदामंत्री अँड रमाकांत खलब साहेब यांच्या शुभहस्ते या संमेलनाचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी या संमेलनाचे अध्यक्ष सुप्रसिद्ध कादंबरीकार दि.बा. पाटील, अध्यक्ष संजीवन नॉलेज सिटीचे सहसचिव स्वागतअध्यक्ष प्राचार्य एन. आर. भोसले सर, या संमेलनातचे निमंत्रक डॉक्टर श्रीकांत पाटील, संयोजक प्रकाश पाटील, सहसंयोजक मार्गदर्शक माननीय डॉक्टर माधव गुरव आणि मुख्य आयोजक शिवचरण फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. शिवचरण उज्जैनकर व सर्व महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील पदाधिकारी समन्वयक तसेच गोवा राज्य कार्यकारिणीचे सर्व पदाधिकारी या प्रसंगी उपस्थित होते. मान्यवरांना राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

या प्रसंगी अँड रमाकांत घोलप साहेब म्हणाले की, शिवचरण फाउंडेशनचे 1ले अखिल भारतीय शिव मराठी साहित्य संमेलन आमच्या गोवा येथील बोरी फोंडा या ठिकाणी तीन महिन्यापूर्वी संपन्न झाले. आज हे 2रे संमेलन संजीवन सिटी पन्हाळाला या ठिकाणी आयोजित असून खऱ्या अर्थाने उज्जैनकर फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉक्टर शिवचरण उज्जैनकर हे मराठी भाषा प्रबोधन प्रचार आणि प्रसारासाठी आणि सर्व साहित्यिक रसिकांना व्यासपीठ देण्यासाठी कार्य करत असल्याचे त्यांनी फाउंडेशनचे कौतुक केले.

भोजनानंतरच्या सत्रामध्ये उज्जैनकर फाउंडेशनचे राज्य अध्यक्ष डॉ सतिष तराळ अमरावती यांचे अध्यक्षते खाली कथाकथन कार्यक्रम संपन्न झाला. याप्रसंगी प्रा. अशोक कोकाटे कोल्हापूर व इतर आदींनी सहभाग नोंदवला. याप्रसंगी सौ जमादार मॅडम पुष्पावती दरेकर आदींनी सूत्रसंचालन केले.

यानंतर दोन वेळा राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक डॉ. श्रीकांत पाटील यांची प्रदीर्घ मुलाखत घेण्यात आली. या मधून शिवचरण उज्जैनकर फाउंडेशनचे महाराष्ट्र राज्य संपर्कप्रमुख राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त शिक्षक आणि राज्य शासन पुरस्कार प्राप्त साहित्यिक डॉ.श्रीकांत पाटील यांच्या साहीत्यिक प्रवासातील चढ उतार, त्या मागील प्रेरणा, त्यांचे कार्य, मातृभाषा मराठी व वारणा काठावरील मायबोली विषयीचे प्रेम बघून साहीत्यिक भारावून गेले. या प्रसंगी सुप्रसिद्ध साहित्यिका डॉ प्रतिभा इंगोले उपस्थित होत्या.

त्यानंतर सुप्रसिद्ध कवी रमजान मुल्ला नागठाणे जिल्हा सांगली चे अध्यक्षतेखाली बहारदार कवि संम्मेलन संपन्न झाले .भारतातून अनेक साहित्यिक कवींच्या बहारदार कविता सादर करतांना सभागृहात विविध भाव टिपले गेले.

औरंगाबाद येथून कवी ॲड सर्जेराव साळवे यांनी सहभागी होऊन पन्हाळा चरणी लीन होऊन आपली धन्य धन्य झालो चरण स्पर्शून ही कविता सादर करुन सर्वांना छत्रपती शिवरायांच्या कालखंडात घेऊन गेले. या वेळी प्रा. डॉ. चंद्रकांत पोतदार चंदगड, प्रा. सुरेश कुराडे, लता गुठे, फाउंडेशनच्या राज्य समन्वयक, मुंबई, सौ. सोनल गाडेकर, शिरोली, पुष्पावती दरेकर, कोल्हापूर , सतीश सोळाकुरकर, सौ.वृषाली शिंदे ठाणे, , अँड प्रकाश तळवडे कर राजीव नाईक, अवधूत शिरोडकर सर्व गोवा. प्रसाद सावंत, दुर्गाकुमार नावती, सौ. पूर्णिमा देसाई सर्व मडगाव गोवा, डॉ. अनिता तिळवे, माधुरी उजगावकर फोंडा गोवा, तानाजी बो-हाडे , आंबेगाव पुणे, परशराम आंबी, मनोहर भोसले, नसीम जमादार, प्रणिता तेली, संभाजी चौगले, बाबा कदम, दीक्षा गुरव, अजयकुमार वंगे, उर्मिला तेली, रवींद्र महापुरे, प्रवीण सूर्यवंशी, सर्व कोल्हापूर संदीप व्हनाळे, चोकाक, सौ. विद्या खामकर गारगोटी, दीपक तोडकर हुपरी, आराधना गुरव सातारा, आरती लाटणे, सौ. सुवर्णा पवार इचलकरंजी, श्रीकांत माने कुंडल, सौ. जयश्री पवार ठाणे, प्रा. डॉ. राजकुमार कांकरिया, मधुकर पोतदार, जळगाव, अँड विजयकुमार कस्तुरे, शाहीर मनोहर पवार, शितल शेगोकार सर्व बुलढाणा रामदास कोरडे साखरखेर्डा, एस. के. पाटील, पी. एस. कांबळे आकुरडे, भुदरगड, डॉ.अशोक शिरसाट अकोला, अँड सर्जेराव साळवे औरंगाबाद, मधुकर हुजरे धाराशिव, सुभाष उमरकर नाशिक, बाळकृष्ण अमृतकर, सविता कुरुंदवाडे, योगेश उंबरकर, स्नेहा गावंडे सर्व पुणे ,रमेश उज्जैनकर बदलापूर, आनंद कुलकर्णी, उत्तम सावंत, इस्लामपूर, रमेश खडांगडे कामेरी, सौ. मनीषा पाटील देशिंग हरोली, अभिजीत पाटील सौ.मेघाताई पाटील सांगली, सिंधुताई दहिफळे हिंगोली गोविंद पाठक बीड, मनीषा घेवडे, फर्जना डांगे मुंबई, गणेश निकम चाळीसगाव आदी मान्यवर कवींचा निमंत्रित कवी म्हणून या कवी संमेलनात सहभाग होता.

कवी संमेलनानंतर ॲड विजयकुमार कस्तुरे, ॲड सर्जेराव साळवे, बबनराव महामुने, मनोहर पवार यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. या प्रसंगी शिवचरण उज्जैनकर फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. शिवचरण उज्जैनकर खजिनदार सौ संगीता उज्जैनकर फाउंडेशनचे राज्य संपर्कप्रमुख डॉ. श्रीकांत पाटील सर राज्य उपाध्यक्ष शिल्पकार एम.डी. रावण सर राज्य सहसचिव डॉ. मा.ग.गुरव सर कोल्हापूर जिल्हा समन्वयक परशराम आंबि सर, लेखक दत्ता मोरसे व फाउंडेशनचे सर्व सन्माननीय पदाधिकाग्री त्याचप्रमाणे बुलढाणा जिल्हा अध्यक्ष शाहीर मनोहर पवार, ठाणे जिल्हा समन्वयक रमेश उज्जैनकर, तसेच फाउंडेशनचे पदाधिकारी कार्यकारी सदस्य सौ. जयश्री नितीन भोंबे मॅडम फाउंडेशनचे आजीव सभासद चि. अरविंद उज्जैनकर बुलढाणा जिल्हा समितीचे सचिव शंकर अनासूने सर जिल्हा महिला संघटक सौ.मेघा शंकर अनासूने जिल्हा संघटक कवी रामदास कोरडे जिल्हा समन्वयक शितल शेगोकार जिल्हा समन्वयक परशराम आंबी सर उस्मानाबाद जिल्ह्याचे समन्वयक कवी मधुकर हुजरे पुणे जिल्हा समन्वयक बाळकृष्ण अमृतकर सर मनोहरराव रोकडे साहेब सौ.जया रवींद्र सावरकर सौ.चंदा कोरडे चि.जय कोरडे चि.यश कोरडे राहुल यावेळी सुप्रसिद्ध साहित्यिक व जेष्ठ कवी, कवयित्री हजर होते. शेवटी आभारप्रदर्शनानंतर कार्यक्रम समाप्त झाला.




# भरधाव बसने पादचाऱ्यास चिरडले

आधुनिक केसरी न्यूज



**बिडकिन :** पैठण तालुक्यातील चितेगाव येथील जिल्हा परिषद शाळेसमोरुन भरघाव वेगाने जाणाऱ्या बसने पादचाऱ्यास उडवुन दिल्याने पादचारी जागीच ठार झाला आहे. पैठण औद्योगिक वसाहतीमधील खाजगी कंपनीची बस प्रवासी सोडुन पैठणकडुन औरंगाबादच्या दिशेने जात असताना हा अपघात झाला असून यात राहुल कल्याण त्रिभुवन, वय.२८ वर्षे, रा.चितेगाव, ता. पैठण हा व्यक्ती जागीच ठार झाला आहे .घटनास्थळी बिडकिन पोलिसांनी धाव घेत स्थानिक नागरिकांच्या मदतीने अपघातातील त्रिभुवन यास ग्रामीण रुग्णालय बिडकिन येथे दाखल केले असता वैद्यकीय अधिकारी डॉ संजय गोरे यांनी तपासुन मयत घोषित केले आहे. डॉ.गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली शवविच्छेदन करण्यात आले आहे. पैठण ते औरंगाबाद रोडवरील अपघाताची संख्या वाढत चालली असल्याने वाहतूक करणाऱ्या वाहनधारकांना आपला जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत असल्याचे स्पष्ट होत आहे.सदरिल घटनेचा तपास सहायक पोलिस निरीक्षक संतोष माने यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस नाईक दिलीप साळवे हे करित आहेत.

# सौदी अरेबियात जाण्यासाठी स्वतःच्याच घरी चोरी

आधुनिक केसरी न्यूज

**नागपुर :** नागपुरातील शांतीनगर येथील 73 लाखांच्या धाडसी चोरीने पोलिसांसमोर आव्हान निर्माण झाले होते. या चोरीचा पोलिसांच्या तपास पथकांनी छडा लावून दोघांना अटक केली. मात्र जे समोर आलं ते धक्कादायकच होतं. तक्रारकर्त्याचा मुलगा आणि दुकानातील नोकरच या चोरीचे आरोपी निघाले आहेत. चोरीची रक्कम घेऊन आरोपी सौदी अरेबियात पळून जाण्याच्या तयारीत असल्याचे तपासात पुढे आले आहे. जाफर जावेद थारा (वय 28, कश्यप ले-आऊट, महेशनगर) आणि वाजीद गफुर अली (वय 27, गांजा खेत चौक) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. शांतीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत जावेद अब्दुल रज्जाक थारा (वय 56, प्लॅट क्रमांक एच-3, महेशनगर, कश्यप कॉलनी) हे रविवारी कुटुंबासह कामठी येथे साखरपुड्याच्या कार्यक्रमासाठी गेले होते. दरम्यान, अज्ञात आरोपीने त्यांच्या घराच्या मुख्य दाराचे कुलूप तोडून बेडरुममधील कपाटात ठेवलेले इलेक्ट्रॉनिक लॉकर उघडून त्यातील 500 रुपयांचे 26 बंडल असे 13 लाख रुपये आणि सोन्याचे दीड किलो वजनाचे दागिने किंमत 60 लाख रुपये असा एकूण 73 लाखांचा मुद्देमाल चोरुन नेला होता. ही घटना समजताच परिसरात एकच खळबळ उडाली होती. इलेक्ट्रॅनिक लॉकर उघडून चोरट्यांनी रक्कम, दागिने पळविल्यामुळे लॉकरचा कोड माहिती असणाऱ्यानेच ही चोरी केली असावी, अशी शंका गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांना आली. त्यानुसार त्यांनी जावेद अब्दुल रज्जाक थारा यांच्या दुकानातील कामगार आरोपी वाजीद गफुर अली यास ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली.

# दाभोळचा गॅस आणि वीजनिर्मिती प्रकल्प पुन्हा सुरू होणार ?

आधुनिक केसरी न्यूज

**रत्नागिरी :** जिल्ह्यातील बंद पडलेला दाभोळचा गॅस आणि वीजनिर्मिती प्रकल्प पुन्हा सुरू करण्याच्या हालचाली सुरु झाल्या आहेत. रत्नागिरी गॅस आणि वीजनिर्मिती प्रकल्प सुरू करण्यासाठी राज्य सरकारनं प्रयत्न सुरु केले आहेत. नैसर्गिक वायूवर आधारित प्रकल्प सुरु करून विजेची वाढती मागणी भागवण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. कोळशाचा तुटवडा लक्षात घेता नैसर्गिक वायूवरील हा प्रकल्प सुरु करण्यासाठी पाठपुरावा सुरु करण्यात आलाय. केंद्रीय उर्जामंत्री आर. के. सिंह यांच्या अध्यक्षतेखाली देशातील गॅस आधारित वीज प्रकल्पांशी संबंधित एक बैठकही झाली.

एकीकडे विजेची वाढती मागणी आणि दुसरीकडे कोळशाचा तुटवडा लक्षात घेता नैसर्गिक वायूवरील हा प्रकल्प सुरू करण्यासाठी केंद्र सरकार प्रयत्न करत आहे. किफायतशीर दराने अखंडित गॅस पुरवठा झाल्यास या प्रकल्पातून कमी दराने वीजनिर्मिती होऊ शकते यासाठी राज्य सरकारचा केंद्राकडे पाठपुरावा सुरू केला आहे. केंद्रीय ऊर्जामंत्री आर. के. सिंग यांच्या अध्यक्षतेखाली देशातील गॅस आधारित वीज प्रकल्पांशी संबंधित एक बैठकही पार पडली.

सध्या एनटीपीसी या कंपनीतील प्रमुख भागधारक आहे तर राज्य वीज कंपनीचे भागभांडवल खूपच कमी आहे. किफायतशीर दराने अखंडित गॅस पुरवठा झाल्यास या प्रकल्पातून कमी दराने वीजनिर्मिती होऊ शकते. त्यासाठीच केंद्राकडे पाठपुरावा केला जात असल्याचे सूत्रांनी सांगितले. योग्य दरात गॅसची उपलब्धता होत नसल्याने या प्रकल्पातून 6 रुपये 50 पैसे प्रतियुनिट या उच्च दरात वीजनिर्मिती केली जात होती. त्यामुळे रत्नागिरी गॅस आणि वीज कंपनीबरोबर कुणीही वीज खरेदी करार करायला तयार नाही. सध्या एनटीपीसी या कंपनीतील प्रमुख भागधारक आहे, तर राज्य वीज कंपनीचे भागभांडवल खूपच कमी आहे.

### दाभोळ वीज कंपनीतील वीज निर्मिती मार्च महिन्यात बंद

नॅचरल गॅस कमी दरामध्ये उपलब्ध होत असल्याने सुरुवातीपासून आरजीपीपीएल कंपनीला वीज निर्मितीसाठी तारेवरील कसरत करावी लागत होती . केंद्र सरकारने गॅस वरील सबसिडी देऊन रेल्वेसाठी 500 मेगावॅट वीजनिर्मितीचा करार करून आरजीपीपीएल कंपनी सुरु ठेवण्याचा प्रयत्न केला होता . 1 एप्रिल 2017 पासून ते मार्च 2022 पर्यंत पाच वर्षाकरता हा करार करण्यात आला होता . मध्यंतरीच्या काळात गॅसवरील सबसिडी बंद केल्याने तयार होणारी वीज महाग ठरली . परिणामी रेल्वेकडील विजेची मागणी कमी करण्यात आली होती . शेवटच्या स्टेजमध्ये दिवसाला 250 ते 300 मेगावॅट मागणीनुसार वीज निर्मिती केली जात होती . करार संपुष्टात येत असताना व कमी दरामध्ये वीज निर्मिती होत नसल्याने कोणताही नवीन वीज खरेदीचा करार झाला नाही . शेवटी गुरुवारी 31 मार्च 2022 रोजीच्या मध्यरात्री आरजीपीपीएल कंपनीची वीजनिर्मिती पूर्णपणे बंद करण्यात आली .

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत

(रविवारी मोफत तपासणी)

नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!

(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in